दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२४ | बुधवार दि.०४ नोव्हेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय....

गुजरात मॉडेल'च्या विकासाच्या दाव्यांमागील शैक्षणिक वास्तव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ देशासमोर विकासाचा सर्वोत्कृष्ट मापदंड म्हणून सादर करण्यात आलेले 'गुजरात मॉडेल' सध्या राज्यातील सरकारी शाळांच्या दरावस्थेमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका मीडिया वृत्तानुसार, गुजरातच्या ग्रामीण आणि आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षणाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी तफावत उघड झाली आहे, ज्यामुळे भव्य विकास आराखडे आणि जमिनीवरील वास्तव यातील अंतर स्पष्ट होते.

थोडक्यात...

शरद पवारांच्या प्रकृतीत सुधारणा

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले आहे. छातीत सौम्य वेदना जाणवत असल्याने नियमित आरोग्य तपासणी आणि वैद्यकीय देखरेखीसाठी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. याचदरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये डॉक्टरांच्या देखरेखीखाली शरद पवार यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली आहे. त्यांना होत असलेला त्रास आता कमी झाला असून, त्यांची प्रकृती चांगली आहे. त्यामुळे बुधवारी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. शरद पवार महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांच्या तीन दिवसीय दौऱ्यावर होते. दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी धाराशिव येथे असताना दुपारच्या सुमारास त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे त्यांनी आपला दौरा मध्येच स्थगित केला आणि तातडीने पुण्याकडे रवाना झाले.

काशी विश्वनाथ मंदिराचे दरवाजे खुले राहणार

वाराणसी: दिवाळी आणि धनत्रयोदशीच्या पावन पर्वावर काशी विश्वनाथ मंदिर भाविकांसाठी खुले राहणार आहे. तसेच, दर्शनासाठी ऑनलाइन तिकीट बुकिंगची सुविधाही सुरू राहणार आहे. मात्र, अन्नकूट उत्सवाच्या तयारीसाठी ९ नोव्हेंबरच्या दुपारपासून ते १० नोव्हेंबरच्या संध्याकाळपर्यंत ऑनलाइन तिकीट बुकिंग तात्पुरती बंद ठेवण्यात येणार आहे. याशिवाय, काशी विश्वनाथ धाममध्ये भव्य सजावट करण्यात येणार असून, २४ नोव्हेंबर २०२६ रोजी देव दीपावलीनिमित्त लाखो दिव्यांनी गंगा घाट उजळून निघणार आहे. मंदिर प्रशासनातील एका अधिकाऱ्याने मंगळवारी ही माहिती दिली. या मोठ्या सणांच्या काळात दर्शनासाठी ऑनलाइन तिकीट बुकिंगची सुविधाही सुरू राहणार आहे. त्यामुळे देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांना कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागणार नाही. मात्र, मंदिर प्रशासनाने काही ठरावीक वेळेसाठी ऑनलाइन बुकिंग बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

टीबीमुक्त महाराष्ट्रासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

मुंबई: क्षयरोगाचे जलद व अचूक निदान करून टीबीमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. राज्यातील दुर्गम व ग्रामीण भागांतील नागरिकांनाही जलद व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी ३०० अत्याधुनिक ट्रूनॅट कात्रो आण्विक निदान यंत्रे बसविण्यात येणार आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत राज्यभर प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हास्तरीय आरोग्य संस्थांमध्ये ही यंत्रे बसविण्यात येणार आहेत. जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता असलेल्या या आधुनिक यंत्रांमुळे क्षयरोगाचे लवकर आणि अचूक निदान करणे शक्य होणार आहे. फडणवीस यांनी सांगितले की, सुमारे ४१.९२ कोटी रुपये खर्चाच्या आणि २१ महिने कालावधीच्या या प्रकल्पासाठी बीपीसीएल फाउंडेशन, एचआयटीईएस-एचएलएल इन्फ्रा टेक सर्व्हिसेस लिमिटेड ही कार्यान्वयन संस्था आणि सहसंचालक, आरोग्य सेवा (क्षयरोग व कुष्ठरोग) यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे दुर्गम आणि ग्रामीण भागांतही आधुनिक निदान सुविधांचा विस्तार होईल.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०३ नोव्हेंब २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ३९.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,९००	४,२०१	३,२१०

ज्वारी/हायब्रिड : ८३.५० क्विंटल

३,४९०	७,८५६	५,७३६१

मका/लोकल: १.०० क्विंटल

२,३००	२,३००	२,३००

तूर : ५.००क्विंटल

७,४००	९,८००	८,७३३

उडीद : ५.०० क्विंटल

८,९९९	९,२००	९,०९९

बाजरी: १४.५० क्विंटल

३,५००	३,९००	३,७१७

मुग: २.०० क्विंटल

९,२००	९,३०१	९,२५०

सोयाबीन: १४२.०० क्विंटल

६,७००	६,९२५	६,८४२

हरभरा: ४.५० क्विंटल

५,८००	७,१५०	६,५१३

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र सरकार; मोदींची ग्वाही

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन; फडणवीसांचा विरोधकांवर निशाणा

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची आपल्याला पूर्ण जाणीव असून, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र आणि राज्य सरकार खंबीरपणे उभे आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना अग्रिम मदत दिली असून, पंतप्रधान किसान सन्मान निधीची रक्कमही बँक खात्यांमध्ये जमा केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अजिबात काळजी करू नये. नैसर्गिक आपत्तीच्या या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि. ३ नोव्हेंबर) दिली.

पुणे मेट्रो मार्गिका-३ चे लोकार्पण आणि मेट्रो टप्पा-२ चे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महाराष्ट्रातील प्रतिकूल हवामानामुळे अनेक शेतकरी कुटुंबे संकटात सापडली आहेत. या परिस्थितीची केंद्र सरकारला जाणीव असून, शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकार संवेदनशीलतेने काम करत असल्याचे मोदी यांनी स्पष्ट केले. विकसित भारताच्या उभारणीत शेतकऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात मागील काही वर्षांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जलसंधारणाची अनेक कामे करण्यात आली. मात्र, नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत एनडीए सरकार शेतकऱ्यांच्या



पाठीशी ठामपणे उभे आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या एकत्रित प्रयत्नांतून या संकटाचा सामना केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सणासुदीचे दिवस सुरू आहेत. अशा वेळी अडचणीत असलेल्या शेतकरी बंधू-भगिनींच्या परिस्थितीची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. शेतकऱ्यांच्या घरातही दिवाळी साजरी झाली पाहिजे, ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मदतीचा हात देण्याची गरज आहे. नैसर्गिक आपत्तीचा सामना आपण सर्वांनी एकजुटीने केला पाहिजे. एकजुटीचे प्रयत्न हेच विकसित भारताच्या वाटचालीचे बळ असल्याचेही मोदी म्हणाले. यावेळी त्यांनी ▶▶ पान २ वर

पाच हजारांत शेतकऱ्यांची दिवाळी कशी होणार?

आदित्य ठाकरेंकडून बांधावर जाऊन पाहणी; शेतकऱ्यांसाठी मोठा मोर्चा काढणार



संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना सरकारने त्यांना वाऱ्यावर सोडले आहे. अतिवृष्टी, पीक विमा, नुकसानभरपाई आणि कर्जमाफी यापैकी कोणत्याही बाबतीत शेतकऱ्यांना अपेक्षित दिलासा मिळालेला नाही. सरकारने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदतही अनेक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांत शेतकऱ्यांची दिवाळी कशी होणार, असा सवाल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी सरकारला केला.

वैजापूर तालुक्यातील गारज आणि कन्नड तालुक्यातील जेहूर या दुष्काळग्रस्त गावांना भेट देऊन ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतातील सोयाबीन, तूर, मूग आणि कापूस या पिकांची अवस्था जाणून घेतली. पावसाअभावी पिकांचे झालेले नुकसान, उत्पादनातील घट आणि त्यामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेले आर्थिक संकट याबाबत ▶▶ पान २ वर

तर मी १०० वेळा रॅम्प वॉक करेन टीकेनंतर पंकजा मुंडे संतापल्या

विरोधकांना दिले सडेतोड प्रत्युत्तर



संभाजीनगर । प्रतिनिधी

जालन्यातील ग्रामीण महिलांच्या हाताला रोजगार मिळावा आणि त्यांनी तयार केलेल्या सिल्क साडीला मुंबईसह देशाच्या बाजारात ओळख मिळावी, यासाठी मला जर परत जाऊन रॅम्प वॉक करावा लागला, तर मी नक्की करेन, असा पलटवार भारतीय जनता पक्षाच्या नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी केला आहे. जालना दौऱ्यावर असताना त्यांनी दुष्काळ पाहणी, पाण्याचा प्रश्न आणि 'बॉम्बे टाइम्स फॅशन वीक'मधील रॅम्प वॉकवर झालेल्या टीकेवर भाष्य करत मराठवाडा पदवीधर निवडणुकीच्या निकालावरही अत्यंत रोखठोक प्रतिक्रिया दिली.

मंत्री मुंडे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्या बोलत होत्या. पंकजा मुंडे म्हणाल्या की, मी एका २४ वर्षांच्या मुलाची आई आहे आणि गेली २२ वर्षे राजकारणात सक्रिय आहे. मी ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करते. 'बॉम्बे टाइम्स फॅशन वीक' या कार्यक्रमात जालन्यातील काही महिलांच्या सिल्कचा स्टॉल लागला होता आणि त्यांच्या कामाला ओळख मिळवून देण्यासाठीच मी तो रॅम्प वॉक केला. मला कसलीही हौस नाही; पण माझ्या जालन्यातील महिलांची साडी जर मुंबईची एखादी महिला विकत घेत ▶▶ पान २ वर

बीडमधील व्यापाऱ्याला दोन नेपाळी तरूणीनी लावला ४७ लाखांला चुना

तो व्यापारी कोण शहरात चर्चेला उधाण

बीड । प्रतिनिधी

ऑनलाईन ॲपवर मैत्री करून खासगी व्हिडीओच्या माध्यमातून बीडमधील एका ३६ वर्षीय प्रतिष्ठित व्यापाऱ्याला तब्बल ४७ लाख रुपयांना लुटल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत ही प्रचंड मोठी रक्कम उकळण्यात आल्याने बीड शहरात खळबळ उडाली असून, हा व्यापारी नेमका कोण, याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यापाऱ्याची 'टँगो' या सोशल मीडिया/व्हिडीओ कॉलिंग ॲपवर ओळख झाली होती. संभाषणादरम्यान नेपाळी तरुणींनी व्यापाऱ्याचा एक खासगी व्हिडीओ स्क्रीन रेकॉर्ड केला. त्यानंतर हा व्हिडीओ सोशल मीडियावर आणि नातेवाईकांमध्ये व्हायरल करण्याची भीती दाखवून ब्लॅकमेलिंगचे सत्र सुरू झाले. बदनामीच्या भीतीने व्यापाऱ्याने वारंवार पैसे दिले, ज्याची एकूण रक्कम तब्बल ४७ लाखांवर पोहोचली. अखेर सततच्या त्रासाला कंटाळून व्यापाऱ्याने पुराव्यासह पोलिसांत धाव घेतली. याप्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात प्रिया देवी प्रसाद आणि तमन्ना रावत या दोन नेपाळी तरुणींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक अंदाजानुसार, या तरुणी एका मोठ्या ▶▶ पान २ वर

सीईटी घोटाळ्याचा '२५ लाखांचा रेट'?

रोहित पवारांच्या आरोपाने शिक्षण क्षेत्रात खळबळ

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सीईटी परीक्षेच्या माध्यमातून होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेत मोठा घोटाळा होत असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आमदार रोहित पवार यांनी केला आहे.

टॉप इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी २५ लाख रुपयांचा रेट सांगितला जात असल्याचा दावा करत त्यांनी स्टिंग ऑपरेशनमधील माहिती समोर आणली. या प्रकरणामुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या आरोपांदरम्यान काही शिक्षकांनी



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. रोहित पवार यांनी सीईटी परीक्षेतील कथित डेटा लीकचा मुद्दा उपस्थित केला. या प्रकरणी तक्रार करण्यात आली असून, ▶▶ पान २ वर

अभिनेत्री दिया मिर्झाला लक्ष्य करणाऱ्या भाजपा नेत्यांना उच्च न्यायालयाने फटकारले

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी 'पर्यावरणपूरक दिवाळी' मोहिमेवरून निर्माण झालेल्या वादावर तीव्र आक्षेप घेतला. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'फटाकेमुक्त दिवाळी' मोहिमेचा भाग असलेल्या एका व्हिडिओमध्ये अभिनेत्री दिया मिर्झा सहभागी झाली होती. यावरून तिला लक्ष्य करणाऱ्या आणि या मोहिमेला धार्मिक वळण देणाऱ्या राजकीय नेत्यांना न्यायालयाने चांगलेच फटकारले.

न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि



न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने, बीएमसीने तो व्हिडिओ हटवल्याबद्दल आक्षेप नोंदवला आणि या राजकीय विरोधाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. मुंबई उच्च ▶▶ पान २ वर

आंदोलनांसाठी जागा अनिश्चित काळ बळकावता येणार नाही!

सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण; जंतरमंतरवरील आंदोलन आणि व्यापाऱ्यांच्या नुकसानीचा मुद्दा ऐरणीवर

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

आंदोलन करण्याचा अधिकार असला, तरी त्यासाठी सार्वजनिक जागा अनिश्चित काळासाठी बळकावून ठेवता येणार नाही. एवढेच नव्हे, तर आंदोलनांसाठी अधिकृतरीत्या निश्चित केलेल्या जागांवरही निदर्शने करण्यासाठी ठराविक कालमर्यादा असणे आवश्यक आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले



आहे. दिल्लीतील जंतरमंतर आणि रामलीला मैदानावरील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने ही भूमिका मांडली. तसेच, सण-उत्सवांच्या काळात आंदोलनांमुळे व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याच्या याचिकेवर ▶▶ पान २ वर

मतचोरीवर चर्चेपूर्वी मुख्य निवडणूक आयुक्तांचा राजीनामा घ्या!

अमित शहांच्या आव्हानाला काँग्रेसचे प्रतिआव्हान

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्द्यावरून देशातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. कथित मतचोरी आणि मतदारयाद्यांमधील फेरफाराच्या आरोपांवरून विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला लक्ष्य केले असतानाच, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विरोधकांना संसदेतील चर्चेचे खुले



आव्हान दिले. मात्र, शहांच्या या आव्हानाला काँग्रेसने आक्रमक प्रतिआव्हान देत चर्चेपूर्वी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची निश्चिती करा आणि एसआयआरची प्रक्रिया थांबवा, अशी मागणी केली आहे. ▶▶ पान २ वर

समोरासमोर चर्चा होऊ द्या – राहुल गाधी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा एकदा थेट चर्चेचे आव्हान दिले आहे. 'विरोधक देशद्रोही आहेत', असा आरोप केला जात असल्याचा संदर्भ देत राहुल गांधी यांनी परदेशी शक्तींशी संबंध कोणाचे आहेत, यावर खुली चर्चा करण्याची मागणी केली. तुम्ही वेळ आणि ठिकाण ठरवा. एका बाजूला तुम्ही आणि दुसऱ्या बाजूला मी बसेन. माध्यमे आणि देशातील तरुणांसमोर चर्चा होऊ द्या, असे राहुल गांधी म्हणाले. या चर्चेसाठी कोणालाही न्यायाधीश बनवा. मोहन भागवत यांच्यासारख्या व्यक्तीलाही न्यायाधीश म्हणून बसवण्याची तयारीही त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र सरकार कोसळणार–वडेट्टीवार

मुंबई । प्रतिनिधी

भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत तसेच देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यातील संबंध ताणले आहे. त्यात एकमेकांना चेकमेट आहे. पूर्णेकर हत्या प्रकरणात जो काही वाद निर्माण झालेला आहे, त्याला भारतीय जनता पक्षाने हवा दिलेली आहे. निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात उभे राहिले, एकमेकांशी संवाद संपला आहे. निधीच्या फायली अडवल्या जात आहे. निधी वाटपावरून गोंधळ निर्माण झाला आहे. आता भाजपने ठरवून शिंदे सेनेची जिरवणे सुरू केले आहे. अशी बोचरी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. दोन्ही पक्षांमध्ये प्रचंड धुसफूस आहे. तुम्ही नांदा, भांडा, काहीही करा, पण तुमच्या भांडणाचे ▶▶ पान २ वर

अग्रलेख

गुजरात मॉडेल'च्या विकासाच्या दाव्यांमागील शैक्षणिक वास्तव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ देशासमोर विकासाचा सर्वोत्कृष्ट मापदंड म्हणून सादर करण्यात आलेले 'गुजरात मॉडेल' सध्या राज्यातील सरकारी शाळांच्या दरावस्थेमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या एका मीडिया वृत्तानुसार, गुजरातच्या ग्रामीण आणि आदिवासी भागातील प्राथमिक शिक्षणाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी तफावत उघड झाली आहे, ज्यामुळे भव्य विकास आराखडे आणि जमिनीवरील वास्तव यातील अंतर स्पष्ट होते.

या विशेष शोध अहवालातील आकडेवारीनुसार, गुजरातमध्ये ७,५९९ सरकारी शाळा आजही पत्र्यांच्या शेडमध्ये (टीन शेड) सुरू आहेत. आधुनिक डिजिटल शाळांचे दावे केले जात असताना, १०५ शाळांमध्ये साधे शौचालयदेखील नाही, आणि ५,००० हून अधिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध नाही. जागतिक बँक आणि आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या सहकार्याने राबवल्या जाणाऱ्या १०,००० कोटींच्या 'मिशन स्कूल्स ऑफ एक्सलन्स' प्रकल्पाच्या उद्घोषणेनंतरही ही मूलभूत तफावत कायम आहे. २२% शाळांमध्ये छताचे पत्रे अत्यंत खराब किंवा तुटलेल्या अवस्थेत आहेत. १४% शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी खेळाचे कोणतेही मैदान नाही. ७% शाळांच्या खोल्यांची इमारती अधिकृतपणे जर्जर किंवा धोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत. ५% शाळा संपूर्ण राज्यात केवळ एकाच शिक्षकाच्या भरवशावर चालवल्या जात आहेत. आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात गुजरातच्या शिक्षण विभागाला ४,०८,०५३ कोटींची भरघोस तरतूद करण्यात आली आहे, जी एकूण अर्थसंकल्पाच्या १५.४८% एवढी मोठी आहे. तरीही विधानसभा आणि संसदेत सादर होणारी आकडेवारी ही प्रत्यक्ष परिस्थिती व्यवस्थापकीय अपयशाकडे बोट दाखवणारी ठरते. या ग्राउंड रिपोर्टमधील अनेक ठळक उदाहरणे पुढे आली आहेत. नसवाडी तालुका येथील एका प्राथमिक आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षकांमार्फत एका शेतकऱ्याच्या घरात शिकवले जात आहे, कारण नव्या इमारतीची निविदा प्रक्रिया प्रशासकीय दिरंगाईमुळे रखडली आहे. खिंसरा ग्रामपंचायतमध्ये ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांचे वर्ग १९८२ पासून तात्पुरत्या खोल्यांमध्ये भरवले जात आहेत. स्थानिक दात्याने जागा देऊनही सरकारी मंजुरीअभावी बांधकाम सुरू झालेले नाही. खानपुर तालुकात दर्यापुरा प्राथमिक शाळेत १३८ मुले जर्जर इमारतीत शिकत असून, त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. पायाभूत सुविधा सुधारण्याऐवजी प्रशासनाकडून वेगळ्याच उपाययोजनांवर भर दिला जात असल्याचे दिसते. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी गुजरात सरकारने एक परिपत्रक जारी करून सरकारी शाळांमध्ये बाहेरील लोकांच्या प्रवेशावर बंदी घातली. यासाठी विद्यार्थ्यांची गोपनीयता आणि पॉक्सो कायद्याचा दाखला देण्यात आला असला, तरी विरोधकांच्या मते शाळांची दुरवस्था लपवण्यासाठी हा प्रयत्न केला गेला आहे. असाच निर्णय राजस्थान सरकारने ऑगस्ट २०२६ मध्ये घेतला होता. दुसरीकडे, केंद्र सरकारच्या अधिकृत 'युडायस प्लस' अहवालानुसार, गुजरातचा माध्यमिक शाळांमधील गळतीचा दर १२.५% वर पोहोचला आहे, जो राष्ट्रीय सरासरीपेक्षा कितीतरी जास्त आहे. भौतिक पायाभूत सुविधा, स्वच्छ पाणी, आणि पुरेशा शिक्षकांची कमतरता जोपर्यंत दूर केली जात नाही, तोपर्यंत केवळ कागदावरील आर्थिक तरतुदींमधून शाश्वत मानवी विकास साधणे कठीण आहे, हेच या आकडेवारीवरून स्पष्ट होते.


शृंगेरी घाटात ट्रकचा भीषण अपघात!

ट्रक चालकाचा जागीच झाला कोळसा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मुगाव मार्गे जाणाऱ्या शृंगेरी घाटात उसाचा मोकळा ट्रक (क्र. ४२ ८५८३) ब्रेक फेल झाल्यामुळे खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाल्याची घटना ३ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री आठच्या सुमारास घडली. अपघातानंतर ट्रकने अचानक पेट घेतल्याने आगीचे भयानक लोळ उठले. ट्रकच्या आगीमुळे परिसरातील डोंगरालाही आग लागल्याची माहिती समोर आली आहे.

अपघाताची माहिती मिळताच मुगाव येथील युवक व सामाजिक कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. ट्रक अत्यंत खोल दरीत कोसळलेला असल्याने आणि आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे घटनास्थळी पोहोचणे कठीण झाले होते. प्राथमिक पाहणीत ट्रकचालक आढळून आला नव्हता. मात्र, मुगाव येथील युवकांनी जवळ जाऊन पाहणी केली असता चालक सागर सोमनाथ इंदलकर हा आगीत होरपळून मृत्यू झाल्याचे दिसून आल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली. घटनेची माहिती ती मिळताच स्थानिक नागरिकांनी आष्टी पोलीस ठाण्याला कळविले. त्यानंतर आष्टी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पुढील तपास सुरू केला आहे. या भीषण अपघातामुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ट्रक खोल दरीत



असल्याने आणि आग मोठ्या प्रमाणावर पसरल्यामुळे बचावकार्य व घटनास्थळाची पाहणी करताना अडचणी येत आहेत. नागरिकांनी घटनास्थळी गर्दी करू नये, आगीपासून सुरक्षित अंतर राखावे आणि पोलिसांना तपास व मदतकार्यात सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

वेतनसुधारणेसाठी निवृत्त न्यायालयीन कर्मचारी उपोषणावर

दिवाळी साजरी न करण्याचा निर्धार; १७ नोव्हेंबरपासून बेमुदत आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

समान काम, समान वेतन या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी आक्रमक झाले आहेत. प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ५ नोव्हेंबर रोजी अंबाजोगाई येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय साखळी उपोषण करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, शासनाच्या भूमिकेचा निषेध म्हणून यंदाची दिवाळी साजरी न करण्याचा निर्धारही कर्मचाऱ्यांनी केला आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनसुधारणेचा प्रस्ताव मुंबई उच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२५ रोजी शासनाकडे पाठविला होता. मात्र, त्यावर अद्याप निर्णय झालेला नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या मागणीसाठी १७ ऑक्टोबर रोजी राज्यभर धरणे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदनही देण्यात आले होते. नाशिक येथील दिगंबर हरी निकम हे ५ नोव्हेंबरपासून आमरण उपोषण करणार असून, त्यांना पाठिंबा म्हणून राज्यभर साखळी उपोषणे केली जाणार आहेत. शासनाने मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न घेतल्यास १७ नोव्हेंबरपासून सेवानिवृत्त कर्मचारी बेमुदत आंदोलन, तर कार्यरत कर्मचारी बेमुदत संपावर जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. वृद्धापकाळात न्यायासाठी आंदोलन करण्याची वेळ आल्याची खंत कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत शेख रागीबचे यश

विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने शाळेत आनंदाचे वातावरण



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा असोसिएशन, बीड यांच्या संयुक्त सहकार्याने सोमवार, दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे जिल्हास्तरीय शालेय कॅरम क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

१४, १७ व १९ वर्षांखालील वयोगटात घेण्यात आलेल्या या स्पर्धांमध्ये तुलसी इंग्लिश स्कूल, बीडचा विद्यार्थी शेख रागीब याने उत्कृष्ट खेळाचे कौशल्य दाखवत चमकदार कामगिरी केली. त्याच्या या उल्लेखनीय यशाची दखल घेत त्याची विभागीय स्तरावरील कॅरम स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्याच्या या यशाने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, त्याच्या या उज्वल यशाबद्दल तुलसी शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे, प्राचार्या उमा जगतकर, क्रीडा शिक्षक मोसिम शेख, चांगदेव निंबाळकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील विभागीय स्पर्धेसाठी त्याला शुभेच्छा दिल्या. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

पान १ वरून...

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठीशी

महाराष्ट्रातील जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन दिले. केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुन्हा स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न महायुती सरकार करेल, असे त्यांनी स्पष्ट केले. पुण्यात पत्रकारांशी बोलताना त्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. ज्यांना मोठ्या वाहनांतून फिरण्याची आणि मोठ्या घरांत राहण्याची सवय आहे, त्यांना पाच हजार रुपयांचे महत्त्व कळणार नाही. मात्र, या रकमेचे महत्त्व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना चांगलेच कळते, असा टोला फडणवीस यांनी विरोधकांना लगावला. शेतकऱ्यांना दिलेली पाच हजार रुपयांची मदत ही अग्रिम स्वरूपातील असून, यापुढेही सरकारकडून मदत केली जाणार आहे. त्यामुळे या मदतीवरून विरोधकांनी केलेली टीका निरर्थक असल्याचे त्यांनी सूचित केले. शेतकऱ्यांना आजवर सर्वाधिक मदत महायुती सरकारनेच केली आहे. यापूर्वीच्या सरकारांनी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले आणि आता तेच लोक सरकारच्या मदतीवर प्रश्न उपस्थित करत आहेत, असा आरोपही फडणवीस यांनी केला. विरोधक काहीही बोलले तरी सरकार शेतकऱ्यांना मदत करण्याच्या भूमिकेपासून मागे हटणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. महाराष्ट्रातील शेतकरी अडचणीत असल्याची दखल घेत पंतप्रधान मोदी यांनी मदतीचे आश्वासन दिल्याबद्दल आनंद वाटत असल्याचेही फडणवीस यांनी नमूद केले. त्यामुळे आगामी काळात केंद्र आणि राज्य सरकारच्या समन्वयातून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कितपत दिलासा मिळतो, याकडे राज्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

तर मी १०० वेळा रॅम्प वॉक करेन

असेल आणि तो पैसा माझ्या ग्रामीण भागातील महिलांच्या खिशात जात असेल, तर मी अशा कामासाठी पुन्हा नक्की रॅम्प वॉक करेन. जालना दौऱ्याच्या हेतूबद्दल सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, या दौऱ्यादरम्यान दुष्काळाचा सविस्तर आढावा घेणार आहेत. तसेच जालना महानगरपालिकेच्या अत्यंत महत्त्वाच्या पाण्याच्या प्रश्नावर विस्तृत चर्चा होणार असून, जिल्हा नियोजन समितीची बैठकही पार पडणार आहे. रेशीम (सिल्क) उद्योगावर भर देताना त्या म्हणाल्या, जालना आणि बीड ही दोन शहरे राज्यात सिल्क निर्मितीत पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावर आहेत. मी जेव्हा ग्रामीण विकास मंत्री होते, तेव्हा महिला बचत गटांची चळवळ अतिशय ताकदीने चालवली होती. जालन्याचे सिल्क फक्त राज्यभरातच नव्हे, तर देशभराच्या बाजारात पोहोचावे आणि ग्रामीण महिलांच्या हाताला सन्मानजनक रोजगार मिळावा, यासाठी मी पूर्ण प्रयत्न करत आहे, असे त्या म्हणाल्या.

पदवीधर निकालात आम्हीच विश्वासदर्शक असल्याचा दावा

मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील पराभवानंतर निर्माण झालेल्या राजकीय वातावरणावर आणि सतीश चव्हाण यांच्या भूमिकेवर विचारले असता, पंकजा मुंडे यांनी अत्यंत मोजक्या अन् सूचक शब्दांत आपली प्रतिक्रिया दिली. मराठवाडा पदवीधर निवडणुकीत सतीश चव्हाण यांच्या खात्यात जी मते पडली आहेत, त्यात खऱ्या अर्थाने विश्वासदर्शक कोणी असेल, तर ते आम्हीच आहोत, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले.

पाच हजारांत शेतकऱ्यांची

त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. गारज येथील तरुण शेतकरी कडुबा त्रिभुवन यांनी यावेळी आपली व्यथा मांडली. शेतीतील नुकसानीमुळे आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून मुलींची दिवाळी कशी करायची, त्यांना सणासाठी माहेरी कसे आणायचे, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा आहे. मुलींना माहेरी आणण्याचीही भीती वाटत असल्याचे सांगताना या शेतकऱ्याला आपल्या भावना अनावर झाल्या. शेतकऱ्यांची ही परिस्थिती पाहता सरकारने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची मदत म्हणजे 'लबाडाचे आवतन' ठरल्याची टीका यावेळी करण्यात आली. मागील वर्षीचा पीक विमा, अतिवृष्टीची नुकसानभरपाई आणि जाहीर केलेली ३२ हजार कोटी रुपयांची मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नाही. कर्जमाफीच्या यादीत नाव असूनही प्रत्यक्ष कर्जमाफीपासून शेतकरी वंचित राहत आहेत. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असताना प्रत्यक्ष मदतीच्या बाबतीत मात्र उदासीनता दिसून येत आहे. राज्यात आणि केंद्रात एकाच विचाराचे सरकार असूनही शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. दरम्यान, नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कार्यक्रमांसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असताना दुसरीकडे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. दुष्काळावर केवळ घोषणा करून चालणार नाही, तर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदत देण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली पाहिजेत. शेतकऱ्यांनीही आपल्या हक्कांसाठी एकजूट होऊन आवाज उठवण्याची गरज आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्यासाठी मोठा मोर्चा काढण्यात येणार असून शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केले. यावेळी शिवसेना नेते अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील, माजी आमदार उदयसिंग राजपूत, बाबासाहेब मोहिते, बबन जाधव, रमेश सावंत, मनाजी पाटील मिसाळ, संजय मोटे, मनोज गायके, संजय निकम, कल्याण चव्हाण, भरत मिसाळ, सतीश जिवरख, बाळासाहेब बडक, धर्मराज दानवे, विठ्ठल डमाळे, उमेश मोकासे, अक्षय साठे, योगेश पवार, हरिष पाटील, महिला आघाडीच्या पद्मा शिंदे व अर्चना सोमासे यांच्यासह शिवसैनिक आणि शेतकरी उपस्थित होते.

सीईटी घोटाळ्याचा '२५ लाखांचा रेट'?

सरकारने विशेष तपास पथकाची नियुक्ती केली आहे. मात्र, तपासात पुढे ठोस हालचाल दिसत नसल्याचा आरोप त्यांनी केला. यावेळी रोहित पवार यांनी स्टिंग ऑपरेशन दाखवले. शिक्षक नारायण शिंगारे यांनी सीईटी परीक्षेतील कथित गैरप्रकारांविषयी माहिती दिल्याचे सांगण्यात आले. टॉप इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी २५ लाख रुपये मागितले जात असल्याचा दावा शिंगारे यांनी केला. या प्रकरणात स्थानिक पोलीस ठाणे आणि एसआयटीकडे गेल्यानंतरही गुन्हा दाखल झाला नसल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, स्टिंग ऑपरेशनमधील दावे आणि कथित व्यवहारांची स्वतंत्रपणे पडताळणी होणे आवश्यक आहे. संबंधित व्यक्ती किंवा संस्थेची बाजूही समोर येणे महत्त्वाचे आहे.

बीडमधील व्यापाऱ्याला दोन नेपाळी

आंतरराष्ट्रीय सायबर ब्लॅकमेलिंग सिंडिकेटचा भाग असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एका नामांकित व्यापाऱ्याला अशा पद्धतीने लाखोंचा गंडा घातल्याचे वृत्त सोशल मीडियावर आणि वृत्तवाहिन्यांवर प्रसिद्ध होताच व्यापारी वर्गात प्रचंड खळबळ उडाली आहे. बदनामीच्या भीतीमुळे पीडित व्यापाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात आली असली, तरी बीडच्या व्यापारी व राजकीय वर्तुळात संबंधित व्यक्ती कोण, याबद्दल उलटसुलट चर्चा रंगत आहेत. अशा प्रकारच्या ऑनलाईन हनीट्रॅप किंवा सायबर ब्लॅकमेलिंगच्या जाळ्यात अनेक जण अडकलेले असू शकतात. त्यामुळे कोणत्याही अनोळखी व्हिडिओ कॉल किंवा ॲपवर वैयक्तिक माहिती शेअर करू नये आणि कोणावरही ब्लॅकमेलिंगचा प्रसंग ओढवल्यास घाबरून टोकाचे पाऊल न उचलता तत्काळ पोलीस प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आंदोलनांसाठी जागा अनिश्चित काळ

केंद्र सरकारसह संबंधित पक्षांना उत्तर देण्याचे निर्देश दिले.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातील निदर्शनांमुळे दिल्लीतील व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम झाल्याचा आरोप करत व्यापारी संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सरकारने जंतरमंतरचा निदर्शनांसाठी अधिकृत जागा म्हणून असलेला दर्जा काढून घेतला असून, रामलीला मैदानासह तीन पर्यायी जागा निश्चित केल्याची माहिती सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयात दिली. २० जुलै रोजीच्या आंदोलनासाठी केवळ एका दिवसाची परवानगी देण्यात आली होती. मात्र, आंदोलकांनी परवानगीची मुदत संपल्यानंतरही जागा सोडली नाही. एवढेच नव्हे, तर संसदेच्या दिशेने मोर्चा काढण्यात आला, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आंदोलनाची हाक देणाऱ्यांनी आपल्या कृतीतून निर्माण होणाऱ्या परिणामांची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे, असे मेहता यांनी स्पष्ट केले. संसद ही केवळ राजकीय इमारत नसून, तिच्या दिशेने मोर्चा काढण्यास परवानगी देता येणार नाही. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेनेही मोर्चा काढता येणार नसल्याची भूमिका त्यांनी मांडली. व्यापारी संघटनांच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी बाजू मांडली. आंदोलनांमुळे व्यापाऱ्यांची विक्री घटली असून, सणासुदीच्या काळात व्यवसाय झाला नाही तर त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते, असे त्यांनी सांगितले. दिवाळीच्या विक्रीवरही आंदोलनांचा परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे पुढील दोन महिने कोणतीही निदर्शने किंवा धरणे आंदोलने होणार नाहीत, याची खात्री करण्याची मागणी त्यांनी न्यायालयाकडे केली. यासाठी काहीतरी वेगळा उपाय शोधण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट भूमिका मांडताना, कोणालाही एखादी जागा कायमस्वरूपी बळकावून ठेवता येणार नाही, असे सांगितले. आंदोलन करण्याचा अधिकार केवळ एका गटापुरता मर्यादित नाही. इतरांनाही आंदोलन करायचे असते. अशा परिस्थितीत शेतकरी, वकील आणि अन्य आंदोलकांनी आंदोलनासाठी कुठे जायचे, असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला. प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार असला, तरी सार्वजनिक जागांचा वापर अनिश्चित काळासाठी करता येणार नाही, असे न्यायालयाने अधोरेखित केले. दरम्यान, 'किराणा कमिटी दिल्ली'ला न्यायालयाने याचिकेत आंदोलनांचे आयोजन करणाऱ्यांनाही पक्षकार करण्याचे निर्देश दिले आहेत. केवळ आंदोलनांमुळे झालेल्या नुकसानीचा मुद्दा उपस्थित करून चालणार नाही, तर ज्यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत, त्या आयोजकांनाही आपली बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे आंदोलनाचा अधिकार, सार्वजनिक जागांचा वापर आणि व्यापाऱ्यांच्या आर्थिक हितसंबंधांबाबतच्या या प्रकरणातील पुढील सुनावणीकडे लक्ष लागले आहे.

अभिनेत्री दिया मिर्झाला लक्ष्य करणाऱ्या

न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने म्हटले, काल जे काही घडले, ते अत्यंत दुर्दैवी आहे. विशेषतः जेव्हा न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत, तेव्हा या विषयाला वेगळेच (धार्मिक) वळण देणे अजिबात योग्य नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे, उच्च न्यायालयाने बीएमसीला तो हटवलेला व्हिडिओ पुन्हा अपलोड करण्याचे निर्देश दिले. उच्च न्यायालय सण-उत्सवांच्या काळात होणारा ध्वनी आणि वायू प्रदूषण या विषयावर स्वतःहून दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करत होते. बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिवाळीत फटाके न फोडता दिव्यांच्या प्रकाशात सण साजरा करण्याचे आवाहन करण्यासाठी, अभिनेत्री दिया मिर्झासह काही प्रसिद्ध व्यक्तींची मदत घेतली होती. उच्च न्यायालयानेच महानगरपालिका प्रशासनाला सामाजिक जनजागृतीसाठी सेलिब्रिटींची मदत घेण्याचे सुचवले होते. मात्र, त्यानंतर काही राजकीय नेत्यांनी सोशल मीडियावर दिया मिर्झाच्या व्हिडिओवर आक्षेप घेत, या मोहिमेला 'हिंदूविरोधी' असे संबोधत तिच्यावर वैयक्तीक टीका केली. या दबावाखाली महानगरपालिकेने इतर सेलिब्रिटींचे व्हिडिओ कायम ठेवून, अभिनेत्री दिया मिर्झाचा व्हिडिओ हटवून टाकला. एका सामाजिक कार्यात सहभागी झाल्याबद्दल अभिनेत्री दिया मिर्झाला ज्या विरोधाचा सामना करावा लागला, त्यावर न्यायालयाने कडक शब्दांत ताशेरे ओढले.

महाराष्ट्र सरकार कोसळणार-वडेट्टीवार

परिणाम महाराष्ट्राच्या विकासावर होऊ नयेत. सरकारमध्ये प्रचंड भ्रष्टाचार वाढलेला आहे. दोघांच्या भांडणात सामान्य माणसाचे हाल होत आहेत. खाली कोणाचेही काम होत नाही. नवरा-बायकोसारखे भांडण सुरू असल्याचा टोलाही विजय वडेट्टीवार यांनी लगावला आहे. ते नागपुरात बोलत होते. दरम्यान, सरकारकडे बहुमत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आपली व्यवस्था बरोबर करून ठेवली आहे. मित्रपक्षातील नेतेसुद्धा त्यांच्या संपर्कात आहेत. मला असे वाटत नाही की, सरकार कोसळणार आहे. असा दावाही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. सरकारला आणि मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, राज्यातील संकटात सापडलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा अवमान करण्याचे काम आमदारांनी केले आहे. हा शेतकऱ्यांचा एवढा मोठा अपमान आहे. सरकारकडून हा अपमान झाल्याचे आम्हाला वाटते. जर त्यांच्यावर कारवाई झाली नाही, तर सरकार या विधानाशी सहमत आहे का? सरकार सहमत नसेल, तर त्यांच्यावर कारवाई करावी. या दुःखात शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू दिसत असतील, शेतकऱ्यांबद्दल जाणीव असेल, तर त्यांच्यावर कारवाई करावी. सरकारच्या विरोधात असंतोष निर्माण झालेला आहे. त्यामुळे गायकवाड यांच्यावर त्वरित कारवाई करावी. शेतकऱ्यांची बदनामी करणाऱ्या व्यक्तीला आमदार म्हणून राहण्याचा काहीही अधिकार नाही. ज्या पक्षात ते काम करत आहेत, त्या पक्षातून त्यांचे निलंबन केले पाहिजे. पुढील कारवाई सरकारने केली पाहिजे. सरकारने डिसेंबरच्या अधिवेशनात प्रस्ताव आणून त्यांना निलंबित केले पाहिजे. ही पहिली वेळ नाही. यापूर्वीही ते अनेकदा खालच्या भाषेत बोलले आहेत. त्यांच्या शब्दांना मर्यादा नाही. अशांची जीभ छाटली पाहिजे. असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

मतचोरीवर चर्चेपूर्वी मुख्य निवडणूक

त्यामुळे संसदेतील संभाव्य चर्चेच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. विरोधी पक्षांनी मतदारयाद्यांच्या पुनरीक्षण प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. एसआयआरच्या माध्यमातून मतदारांची नावे वगळली जात असल्याचा, तसेच मतदारांच्या मतदानाच्या अधिकारावर गदा येण्याची शक्यता असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. या मुद्द्यावरून इंडिया आघाडीने कथित मतचोरीविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. विरोधकांच्या या भूमिकेमुळे केंद्र सरकारवर राजकीय दबाव वाढत असतानाच अमित शहा यांनी संसदेतील चर्चेचा मुद्दा पुढे केला. एसआयआरच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी केंद्र सरकार संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यास तयार असल्याचे शहा यांनी स्पष्ट केले. विरोधकांनी चर्चेपासून पळ काढण्याऐवजी संसदेत यावे आणि या विषयावर आपली भूमिका मांडावी, असे आव्हान त्यांनी दिले. विरोधकांना प्रत्यक्ष चर्चेत रस नसून ते संसदेचे कामकाज ठप्प करण्याचा प्रयत्न करतात, असा आरोपही त्यांनी केला. त्यामुळे विरोधकांकडून केवळ राजकीय आरोप केले जात असून, संसदेत चर्चा करण्याची संधी दिल्यास त्यांची भूमिका स्पष्ट होईल, असा शहांच्या विधानाचा रोख होता. मात्र, काँग्रेसने शहांच्या या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी शहांच्या विधानाला प्रत्युत्तर देताना सरकारच्या भूमिकेतील विसंगती समोर आणण्याचा प्रयत्न केला. स्वतःला चाणक्य समजणारे अमित शहा आता मतचोरीच्या मुद्द्यावर विशेष अधिवेशन बोलावून चर्चा करण्याची तयारी दर्शवत आहेत; मात्र यापूर्वी विरोधकांनी एसआयआरवर संसदेत चर्चेची मागणी केली होती, तेव्हा हा विषय निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रातील असल्याचे सांगून शहांनी चर्चेला नकार दिला होता, अशी आठवण रमेश यांनी करून दिली. सरकारला आता संसदेत चर्चा करण्याची एवढीच इच्छा असेल, तर आधी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची निश्चिती करावी. त्याचबरोबर एसआयआरची प्रक्रिया थांबविण्यात यावी, असे प्रतिआव्हान काँग्रेसने दिले आहे. निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेबाबत विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी चर्चेचे आव्हान देऊन सरकार मूळ मुद्द्यापासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करीत असल्याची टीकाही काँग्रेसच्या भूमिकेतून पुढे येत आहे. विशेष म्हणजे, एसआयआर हा निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रातील विषय असल्याचे सांगून यापूर्वी संसदेतील चर्चेची मागणी नाकारण्यात आली होती. आता त्याच विषयावर विशेष अधिवेशन बोलावण्याची तयारी दर्शवली जात असल्याने सरकारच्या भूमिकेबाबत काँग्रेसने सवाल उपस्थित केला आहे. चर्चा करण्याची तयारी असेल तर त्यासाठी आवश्यक असलेली विश्वासार्हता आणि निष्पक्षतेची खात्रीही सरकारने द्यावी, अशी विरोधकांची भूमिका आहे. दरम्यान, एसआयआरच्या प्रक्रियेवरून निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरही विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मतदारयादी ही लोकशाही प्रक्रियेचा मूलभूत आधार असल्याने त्यातील प्रत्येक बदल पारदर्शक पद्धतीने व्हावा, पात्र मतदाराचे नाव वगळले जाऊ नये आणि अपात्र नावे असल्यास त्यांची नियमानुसार पडताळणी व्हावी, अशी विरोधकांची मागणी आहे.

जाहीर प्रगटन

मा. के. सी. माने ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

बीड, ता.जि. बीड

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १००१/२०२६ .

CNR.No. MHBI0200018042026

पार्वती नारायण फुलचंद व ईतर वि. निरंक

(मार्फत ॲड. यु. ए. काचमांडे)

अर्जदार : १. पार्वती भ्र.फुलचंद जाधव, (पार्वती पि. नारायण मुळे-माहेरकडील नाव) वय-६० वर्षे, धंदा-घरकाम, रा. कर्झणी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात धोंडाबाई नारायण मुळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत धोंडाबाई नारायण मुळे यांचा मृत्यु दिनांक २३/१२/२०२५ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत धोंडाबाई नारायण मुळे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख १७/११/२०२६

आज दिनांक ०७ माहे जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित — क. लिपीक

स्वाक्षरित — **अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व स्तर बीड

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ०४ नोव्हेंबर २०२६

थोडक्यात



राधाताई महाराज यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त सत्कार संपन्न

पाटोदा । प्रतिनिधी

महासांगवीच्या मठाधिपती राधाताई महाराज आईसाहेब सानप यांच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. या सुवर्णमहोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने मठाधिपती राधाताई महाराज आईसाहेब सानप यांना पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह भेट देऊन सत्कार करण्यात आला आणि त्यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी सदिच्छा देण्यात आल्या.

या सत्कार सोहळ्यास व वाढदिवसाच्या कार्यक्रमास गणेश खाडे, फौजी मेजर सुरज गर्जे, अजय गर्जे, रावसाहेब गर्जे आणि सतीश गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी परिसरातील नागरिक व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराज साहेबांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्



पिंपळवंडी:-येथे एसबीआय बँक वित्तीय समावेशन संतृप्ती अभियान व सक्षमीकरण बँक खाते,आरडी,विमा,कर्ज योजना विषयी विभागीय मॅनेजर जयराम खाडे,अंमळनेर शाखा अधिकारी रवींद्र मंडलिक यांनी माहिती दिली.यावेळी विलास पटवा,सतिश पवार,महादेव नाकाडे,सेवक संभाजी सारगुडे,श्रमजीवी युवक व शेतकरी.

जुन्या पिढीतील जेष्ठ विधिज्ञ अॅड.श्रीमंतराव तांदळे यांचे दु:खद निधन

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्हा न्यायालयातील जेष्ठ विधिज्ञ अँड.श्रीमंतराव रंगनाथराव तांदळे यांचं दि.३ नोव्हेंबर २०२६ रोजी उपचार सुरू असताना बीड शहरात दु:खद निधन झालं आहे,मृत्यूसमयी ते ८८ वर्षाचे होते. दुपारी २ वाजता अंकुशनगर येथिल वैकुंठधाम स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात २ मुली व २ भाऊ,बहीण, मुले,सुना, नातवंडे,असा मोठा परिवार आहे, बीड जिल्हा न्यायालयातील सरकारी अभियोक्ता अँड.अजय तांदळे व शासकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश तांदळे यांचे ते वडील आहेत.

बसस्थानकातील सुविधांमधील त्रुटी दूर करा; प्रवाशांना दर्जेदार सेवा द्या!

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्याचे परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांनी आज बीड मध्यवर्ती बसस्थानकाला भेट देऊन तेथील विविध सुविधांची पाहणी केली. बसस्थानकातील प्रसाधनगृहे, चालक-वाहक विश्रांतीगृह, उपाहारगृह आणि पिण्याच्या पाण्याच्या सुविधांमधील त्रुटी निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्या तातडीने दूर करण्याचे निर्देश दिले.

प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे ही एसटी महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. बसस्थानकात येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला चांगला अनुभव मिळावा, तसेच चालक आणि वाहकांनाही आवश्यक विश्रांतीच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सुरू करण्यात आलेल्या मोफत वाचनालयाचीही





त्यांनी पाहणी केली. या वाचनालयाची झालेली दुरवस्था पाहून त्यांनी नाराजी व्यक्त केली. वाचनालयाची अशी अवस्था असणे योग्य नसल्याचे सांगत, ते तातडीने सुरू करून प्रवाशांसह नागरिकांना वाचनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बसस्थानकातील सुविधा केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रवाशांच्या उपयोगाच्या ठरल्या पाहिजेत. त्यासाठी नियमित देखभाल, स्वच्छता आणि सुविधांच्या दर्जावर काटेकोर लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे मंत्री सरनाईक यांनी यावेळी अधोरेखित केले. या पाहणीदरम्यान संबंधित अधिकारी उपस्थित होते.

डॉ.सुधाकर शेंडगे यांचा निरोप समारंभ कुलगुरू यांच्या हस्ते आईचाही गौरव

बीड । प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ.सुधाकर रामभाऊ शेंडगे यांचा निरोप समारंभ घेण्यात आला. यावेळी डॉ.शेंडगे यांच्या आई राजकरावाबाई शेंडगे यांचाही मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विद्यापीठातील महात्मा फुले सभागृहात नुकताच हा कार्यक्रम झाला. प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ संजय कवडे यांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी म्हणाले, गेल्या पावणे तीन वर्षाच्या काळात अनेकांनी स्नेह जडला गेला. अनेक उत्तम सहकारी शिक्षक, कर्मचारी विद्यापीठाला लाभले. आपल्या मातृसंस्थेशी कायम निष्ठा ठेवली पाहिजे, असेही ते म्हणाले. तर मा.कुलगुरु यांच्या कार्यक्रमास



कर्मचा-यांचे पदोन्नतीसह अनेक प्रश्न मार्गी लागल्याचे डॉ.कैलास पाश्रीकर म्हणाले. प्रारंभी संध्या व डॉ.सुधाकर शेंडगे यांचा मा.कुलगरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. डॉ.संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन तर संजय लाब यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ.चंद्रदेव कवडे, डॉ.गणेशराज सोनाळे, डॉ.लक्ष्मणराव धुमाळ, डॉ सुभाष चव्हाण, कार्यकारी अभियंता रविंद्र काळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

विद्यापीठाच्या ऋणातून कसे उत्तराई होणार : डॉ.शेंडगे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व हिंदी विभागाने खूप काही दिले. शिक्षण, नोकरी, नाव आणि लौकिकही मिळाला. यातून उत्तराई कसे होणार, असे डॉ.सुधाकर शेंडगे म्हणाले. विशेषतः मा.कुलगुरु यांनी अनेक पदांवर काम करण्याची संधी दिल्याचा कृतज्ञापूर्वक उलेखही डॉ.शेंडगे यांनी केला. यावेळी राजकरावाबाई शेंडगे यांचाही मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संध्या शेंडगे, मेजर प्रणव शेंडगे. गणेश शेंडगे, डॉ.लक्ष्मणराव धुमाळ यांचीही उपस्थिती होती. डॉ.शेंडगे हे गेल्या ३८ वर्षांपासून संशोधन, अध्यापन क्षेत्रात कार्यरत होते. हिंदी विभागात १६ वर्षांपासून त्यांनी कार्य केले. तसेच गेवराई येथील जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महिला महाविद्यालयात अध्यापन कार्य केले. मूळचे ते कोल्हेर (ता.गेवराई) येथील रहिवाशी आहेत. या काळात त्यांनी विभागप्रमुख, बहिःशाल शिक्षण मंडळ, निरंतर शिक्षण व विस्तार सेवा विभागासह विविध अभ्यास मंडळाचे संचालक आदी पदांवर कार्य केले.

पान ६ वरुन...

मंझरी हवेली फाट्यावरील अपघात

दिले होते. यापूर्वी माजलगाव दौऱ्यादरम्यान बीड बायपास उड्डाणपुलाच्या मागणीप्रमाणेच, मंझरी फाट्याचाही प्रश्न सोडवण्यासाठी पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून केंद्रीय पातळीवर पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी जाहीर भाषणात दिली होती. डॉ.क्षीरसागर यांच्या मागणीचे गांभीर्य ओळखून पंकजाताई मुंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली आणि मंझरी फाट्यावरील अपघातांची भीषण स्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. बीड जिल्ह्यातील हा मार्ग अत्यंत वर्दळीचा असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने येथे उड्डाणपूल मंजूर करण्याची लेखी मागणी त्यांनी केली. गडकरी यांनी यावर तातडीने सकारात्मक पावले उचलत सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत.

गेवराई शहरात डासांचा

समस्येचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन संबंधित भागातील नाल्यांमध्ये बीएससी पावडर टाकणे, औषध फवारणी करणे तसेच फॉगिंग मशीनद्वारे धूर फवारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या समस्येकडे नगरपरिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना डासांच्या त्रासातून दिलासा द्यावा, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी केली आहे.

पिंपळवंडीतील १७८३ पशुधनासाठी

घ्यावा.शासनाच्या निकषांनुसार चारा छावणी सुरू करून जनावरांसाठी चारा,पाणी व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात,अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी युवा नेते अंगदशेठ भोंडवे,प्रा.अशोक (तात्या) मधुकरराव पवार,सुहास तुपे व अनिकेत जावळे उपस्थित होते.१,७८३ पशुधनाचा प्रश्न ऐरणीवर आला असून,प्रशासन आता चारा छावणी सुरू करण्याबाबत काय निर्णय घेते, याकडे पिंपळवंडीतील पशुपालकांचे लक्ष लागले आहे.

आष्टीत घरगुती गॅसचा व्यावसायिक

निर्धारित किमतीव्यतिरिक्त आकारण्यात येणाऱ्या शुल्काची चौकशी करावी.

घरगुती गॅसचा अनधिकृत व्यावसायिक वापर होत आहे का, याची हॉटेल व ढाब्यांमध्ये तपासणी करावी.

गॅस वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखून ग्राहकांना योग्य पावती देण्याची खात्री करावी.

अनधिकृत वसुली किंवा नियमभंग सिद्ध झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी.

नागरिकांच्या तक्रारींसाठी प्रभावी व्यवस्था उपलब्ध करून तक्रारींचा वेळेत निपटारा करावा.

आता तरी पुरवठा विभाग जागा होणार का?

सर्वसामान्य ग्राहकांच्या हक्कांशी संबंधित असलेल्या या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. गॅस वितरणातील कथित गैरप्रकारांची निष्पक्ष चौकशी करून सत्य परिस्थिती स्पष्ट करावी. नियम सर्वांसाठी समान असतील, तर त्यांची अंमलबजावणीही तितक्याच काटेकोरपणे झाली पाहिजे. ग्राहकांची गैरसोय आणि आर्थिक पिळवणूक रोखण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे. संपादकीय भूमिका : ग्राहकांची लूट, घरगुती गॅसचा अनधिकृत वापर किंवा वितरणातील अनियमितता यापैकी कोणताही प्रकार सिद्ध झाल्यास त्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. मात्र, आरोपांची अधिकृत तपासणी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करणे आणि निष्पक्षपणे वस्तुस्थिती समोर आणणे हेच प्रशासनाचे कर्तव्य आहे.

दुष्काळी उपाययोजनांना

दरम्यान, महिला नगरसेविकांना सभागृहात बोलण्यापासून रोखले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. महिला सदस्यांचा सन्मान राखला पाहिजे आणि त्यांच्यावर दबाव आणला जाऊ नये, अशी भूमिका विरोधकांनी मांडली. विषय पत्रिकेवरील कामकाज, सदस्यांना बोलण्याची संधी आणि वैयक्तिक वक्तव्यांवरून सभागृहातील वातावरण तापले. मूलभूत प्रश्नांवर चर्चा पूर्ण झाल्याशिवाय पुढील विषय घेऊ नयेत, अशी मागणी विरोधकांनी कायम ठेवली. अखेर गदारोळात सभा तहकूब करण्यात आली.

आदित्य इंजिनिअरिंग

स्पर्धेच्या यशस्वी मूल्यांकनासाठी अमित प्रतापराव गाढे, अक्षरा ईश्वर गिरे आणि हरिष अशोक शेरकर या तज्ज्ञ व्यक्तींनी परीक्षण केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दर्शन इंगोले आणि नितीन धायगुडे यांनी विशेष परिश्रम घेतले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा पवार व इंदिरा महाजन या होतकरू विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे केले.

परीक्षक अमित गाडे यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचे कौतुक केले. ते म्हणाले, सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय कल्पकतेने आणि सुंदर पद्धतीने इको-फ्रेंडली आकाश कंदील तयार केले आहेत. अशा प्रकारच्या स्पर्धा चॅट जीपीटी किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून सहज माहिती शोधण्यापेक्षा विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांच्यातील उपजत क्रिएटिव्हिटीला योग्य चालना देण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

शहरात नवीन ट्रॅफिक पार्क आणि मनोरंजन केंद्राची उभारणी; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय बैठकीत सादरीकरण

बीड । प्रतिनिधी

शहरातील नागरिकांसाठी आणि वाहतूक नियमांच्या जनजागृतीसाठी प्रस्तावित असलेल्या नवीन ट्रॅफिक पार्क आणि मनोरंजन केंद्राच्या उभारणीबाबत नुकतीच एक महत्त्वाची प्रशासकीय बैठक पार पडली. ही बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली असून, यावेळी त्यांनी या प्रकल्पाच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. या बैठकीत प्रकल्पाच्या सादरीकरणादरम्यान विविध नागरी सुविधा आणि वाहतूक सिम्युलेशन ट्रॅकची सविस्तर माहिती अधिकाऱ्यांसमोर देण्यात आली. या प्रस्तावित ट्रॅफिक पार्कमध्ये टी-जंक्शन, ट्रॅफिक सर्कल, क्रॉस जंक्शन आणि राऊंडअबाऊट यांसारख्या विविध वाहतूक रचनांचा समावेश करण्यात आला आहे. नागरिकांना आणि विशेषतः वाहनचालकांना प्रत्यक्ष अनुभव आणि टेस्ट ड्राईव्ह करता यावी यासाठी सिंगल लेन आणि डबल लेन रस्त्यांची रचना या ठिकाणी केली जाणार आहे.

केवळ वाहतूक शिक्षणापुरते मर्यादित न राहता या ठिकाणी नागरिकांच्या मनोरंजनासाठी देखील विशेष सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रवेशद्वार, चौपाटीच्या धर्तीवर छोटी खाद्यपदार्थांची दुकाने आणि नदीच्या बाजूला पाहता येईल असे एक ॲम्फीथिएटर उभारण्याचे या आराखड्यात प्रस्तावित आहे. तसेच, नागरिकांना



चालण्यासाठी स्वतंत्र फूटपाथ, संपूर्ण रस्त्यावर वाहतुकीचे दिशादर्शक फलक, रंगवलेल्या सायकल लेन, बसण्यासाठी झाडांच्या खाली विशेष व्यवस्था आणि ग्रॅस पेव्हर्स बसवण्यात येणार आहेत. संध्याकाळच्या वेळी लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी हे एक उत्तम विरंगुळ्याचे ठिकाण बनेल यादृष्टीने आराखडा तयार करण्यात आला असून, सर्व कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत करण्याबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी निर्देशित केले. या संपूर्ण प्रकल्पाच्या आर्थिक आणि तांत्रिक बाजूवरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. बांधकाम प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने उत्खनन, पीसीसी आणि स्टॅम्प काँक्रीटचा वापर केला जाणार असून, स्टॅम्प काँक्रीटसाठी सुमारे ४० लाख रुपये आणि पेव्हिंग ब्लॉकसाठी साडेदहा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. जीएसटीसह या मूळ प्रकल्पाचा अंदाजित खर्च १.८६ कोटी ते २.४ कोटी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता सादरीकरणात वर्तवण्यात आली. हा नियोजित प्रकल्प नदीकाठच्या पूरप्रवण क्षेत्रात येत असल्याने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नदीच्या बाजूने एक भक्कम रिटेनिंग वॉल (संरक्षक भिंत) बांधणे अत्यंत गरजेचे असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या संरक्षक भिंतीसाठी स्वतंत्रपणे सुमारे १ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च अपेक्षित असून, या संपूर्ण प्रकल्पाच्या तांत्रिक मान्यतेसाठी आणि पुढील प्रशासकीय प्रक्रियेसाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करून मंजुरीला पाठवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधितांना दिल्या आहेत.

अविनाश पुरी यांना पितृशोक

केज । प्रतिनिधी

मुंबई येथील कार्यालयात आयकर अधिकारी असलेले अविनाश पुरी यांचे वडील श्रीनिवास रामभाऊ पुरी (वय६२) यांचे दीर्घ आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्यावर केज तालुक्यातील साधला येथे त्यांच्या राहत्या घरी पारंपारिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले.



मूळ केज तालुक्यातील साबला येथील रहिवासी असलेले श्रीनिवास रामभाऊ पुरी यांचे यांचे सोमवारी रात्री पाच वाजता शासकीय रुग्णालय धारूर येथे दीर्घ आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्यावर मंगळवारी सकाळी केज तालुक्यातील साबला येथील त्यांच्या राहत्या घरी पारंपारिक पद्धतीने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत्यू समयी त्यांचे वय ६२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,आयकर अधिकारी अविनाश पुरी व अरविंद पुरी असा परिवार आहे.ते सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राध्यापक लक्ष्मण गिरी यांचे मेहुणे होते. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी गावातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

संघर्ष, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर उभे केले विश्वासाचे साम्राज्य!

श्रीराम ज्वेलर्सच्या माध्यमातून युसूफवडगाव व परिसरात विश्वासाचे नाते निर्माण करणारे दत्ता भाऊ निकम यांच्या कर्तृत्वाला सलाम!

युसूफवडगाव । प्रतिनिधी

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी मोठे भांडवल, कौटुंबिक पार्श्वभूमी किंवा अनुकूल परिस्थितीच असावी लागते असे नाही. मनात जिद्द, डोळ्यांत स्वप्न, कष्ट करण्याची तयारी आणि प्रामाणिकपणे काम करण्याची वृत्ती असेल, तर प्रतिकूल परिस्थितीवर मात करूनही यशाचे शिखर गाठता येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे युसूफवडगाव येथील श्रीराम ज्वेलर्सचे संचालक दत्ता भाऊ निकम!

एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या दत्ता भाऊ निकम यांचा आजवरचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. घरची परिस्थिती अत्यंत साधारण, नावापुरती शेती आणि त्यातून कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवण्यापुरतेच उत्पन्न. गरिबी जणू पाचवीला पुजलेली! मात्र परिस्थितीसमोर हार मानायची नाही, आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलायची आणि स्वतःच्या कर्तृत्वावर आयुष्यात काहीतरी वेगळे करून दाखवायचे, असा ठाम निर्धार त्यांनी मनाशी केला. शेतीतून केवळ उदरनिर्वाह भागू शकतो; मात्र कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळवून द्यायचे असेल, तर व्यवसायाची वाट धरावी लागेल, हे त्यांनी ओळखले. पण व्यवसाय कोणता करायचा? त्यासाठी भांडवल कुठून आणायचे? व्यवसायाचे ज्ञान आणि अनुभव कसा मिळवायचा? असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर होते. तरीही त्यांनी परिस्थितीचे रडगाणे न गाता मार्ग शोधण्यास सुरुवात केली.

अखेर सोने-चांदीच्या व्यवसायात स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मात्र हा व्यवसाय केवळ दागिन्यांची खरेदी-विक्री करण्यापुरता मर्यादित नसून त्यामध्ये ग्राहकांचा विश्वास, व्यवहारातील पारदर्शकता, शुद्धतेची जाण आणि व्यावसायिक कौशल्य महत्त्वाचे असते, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे थेट व्यवसाय सुरू करण्याऐवजी त्यांनी आधी या व्यवसायाचे ज्ञान आणि अनुभव मिळवण्याचा मार्ग निवडला.

यासाठी कळंब येथील आपल्या मामांच्या दुकानात काम करण्याचा निर्णय घेतला. आयुष्यात मोठे व्हायचे असेल, तर कष्टाला पर्याय नाही, हे मनाशी पक्के करून त्यांनी तब्बल दहा वर्षे मामांच्या दुकानात प्रामाणिकपणे काम केले. या दहा वर्षांच्या काळात त्यांनी सोने-चांदीच्या व्यवसायातील बारकावे, ग्राहकांशी संवाद साधण्याची पद्धत, दागिन्यांची पारख, व्यवहारातील शिस्त आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याची कला आत्मसात केली.

दहा वर्षांच्या अनुभवाची शिदोरी आणि



मनात जिद्दीचे बळ घेऊन त्यांनी सुमारे पंधरा वर्षांपूर्वी आपल्या युसूफवडगाव या जन्मगावी 'श्रीराम ज्वेलर्स' या नावाने सोने-चांदीच्या व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीला मर्यादित साधनसामग्री असली, तरी प्रामाणिक व्यवहार आणि ग्राहकांना समाधान देण्याचा ध्यास त्यांनी कधीही सोडला नाही.

सुरुवातीपासूनच त्यांनी व्यवसायात केवळ नफा मिळवण्याला प्राधान्य न देता ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण करण्यावर भर दिला. प्रत्येक ग्राहकाला आपलेपणाची वागणूक, व्यवहारात पारदर्शकता आणि विश्वासार्ह सेवा देण्याच्या भूमिकेमुळे हळूहळू ग्राहकांचा ओघ वाढत गेला. एकेक ग्राहक जोडत त्यांनी आपल्या व्यवसायाची विश्वासार्हता निर्माण केली.

आज श्रीराम ज्वेलर्स हे केवळ एक सोने-चांदीचे दुकान राहिलेले नसून युसूफवडगाव आणि परिसरातील अनेक गावांतील ग्राहकांसाठी विश्वासाचे नाव बनले आहे. गावासह परिसरातील ग्राहकांनीही त्यांच्या व्यवसायावर विश्वास दाखवत त्यांना भरभरून साथ दिली आहे. ग्राहकांच्या याच विश्वासामुळे दत्ता भाऊ निकम यांनी व्यवसायात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

विशेष म्हणजे, दहा वर्षे दुसऱ्यांच्या दुकानात काम करून घेतलेला अनुभव आणि त्यानंतर स्वतःच्या व्यवसायासाठी घेतलेले कष्ट, या दोन्ही गोष्टी त्यांच्या यशामागील महत्त्वाचे टप्पे ठरले आहेत. शून्यातून सुरुवात करून स्वतःच्या मेहनतीच्या बळावर व्यवसाय उभा करणे आणि तो अनेक वर्षे विश्वासाने टिकवून ठेवणे, ही साधी गोष्ट नाही.

आजच्या स्पर्धेच्या युगात व्यवसाय वाढवण्यासाठी अनेक मार्ग उपलब्ध असले, तरी ग्राहकांचा विश्वास टिकवणे हे सर्वांत मोठे आव्हान आहे. दत्ता भाऊ निकम यांनी आपल्या कामातून हे सिद्ध केले आहे की, व्यवसायाची खरी ताकद दुकानाच्या आकारात किंवा भांडवलात नसते, तर ग्राहकांच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासात असते.

एका सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे येत स्वतःच्या कष्टाने व्यवसायाची उभारणी करणारे दत्ता भाऊ निकम हे ग्रामीण भागातील तरुणांसाठी निश्चितच प्रेरणास्थान आहेत. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी जिद्द, चिकाटी, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर यशाचा मार्ग निर्माण करता येतो, हे त्यांच्या प्रवासातून दिसून येते. गरिबीवर मात करण्यासाठी पाहिलेले स्वप्न, त्या स्वप्नासाठी घेतलेले कष्ट आणि त्या कष्टातून ग्राहकांच्या मनात निर्माण केलेले विश्वासाचे स्थान... हाच दत्ता भाऊ निकम यांच्या यशाचा खरा प्रवास आहे!श्रीराम ज्वेलर्सच्या माध्यमातून युसूफवडगाव व परिसरात विश्वासाची ओळख निर्माण करणाऱ्या दत्ता भाऊ निकम यांच्या कर्तृत्वाला आणि संघर्षमय वाटचालीला मनापासून सलाम!

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.४ नोव्हेंबर २०२६
४

पाण्याची उपलब्धता असल्यास हरभरा, करडई, ज्वारीची पेरणी १५ नोव्हेंबरपर्यंत शक्य

राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पातीन तज्ज्ञांचा सल्ला

संभाजीनगर : एखादा पाऊस झाला किंवा पाण्याची व्यवस्था असल्यास कमी पाण्यावरील हरभरा, करडई व ज्वारीची पेरणी १५ नोव्हेंबरपर्यंत करता येईल, अशी माहिती राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सी. बी. पाटील यांनी दिली.

महात्मा गांधी मिशन कृषी विज्ञान केंद्र गांधेली व आत्मा, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'दुष्काळजन्य परिस्थितीतील कृषी व्यवस्थापन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. यामधील तांत्रिक सत्रात दुष्काळजन्य परिस्थितीतील कृषी व्यवस्थापन' या विषयावर शास्त्रज्ञांनी उपस्थितांना जमीन पाणी आणि फळपिकांसाठी उपाय सुचवत मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महासंचालक, एमआयटी मुनिष शर्मा तर याप्रसंगी संचालक मजिक इंक्यूबेशन सेंटर आशिष गर्जे, लघु उद्योग भारतीचे पृथ्वीराज शहा, सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाचे सुहास आजगावकर, एमजीएम गांधेलीचे संचालक डॉ.



के. ए. धापके, प्रकल्प उपसंचालक आत्मा डॉ. अभयकुमार पडिले व एमजीएम गांधेलीचे शैक्षणिक संचालक डॉ. कापा सरजन राव रेड्डी यांची उपस्थिती होती. डॉ. रेड्डी यांनी चारा उत्पादनासाठी हायड्रोपोनिक्स, भुशावर युरिया प्रक्रिया व जिथे शक्य आहे तिथे चारा उत्पादन करावे असे सुचवले. सीएसएमएस कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. बी .पाटील म्हणाले की, यंदा फळबाग वाचविण्यासाठी शेतकऱ्यांनी बहार घेऊ नये व बागा जगवण्यासाठी उपलब्ध पाण्याचा काटेकोर उपयोग करावा. यामध्ये पाचटाचे आच्छादन, मटका सिंचन याचा उपयोग करता येईल. सिंचनाची सोय असेल तरच बहार नियोजन शक्य होईल. उन्हाळ्यात प्रति झाड ५ ते ७ लिटर पाणी द्यावे लागेल तरच बागा जगतील. डॉ. पंडित वासरे यांनी पाण्याचे नियोजन करण्यासाठी शेतकऱ्यांनी पाऊस मोजायला शिकले पाहिजे. तसेच मुलस्थानी जलसंधारण महत्त्व उदाहरणासह सांगितले. तसेच चिभड जमिनी सुधारण्यासाठी सबसॉईलरचा वापर आवश्यक आहे. याप्रसंगी पशुसंवर्धनचे जिल्हा उपायुक्त डॉ. नानासाहेब कदम यांनी दुष्काळातील पशुधन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विषय विशेषज्ञ (गृह विज्ञान) डॉ. वैशाली देशमुख, यांनी केले तर आभार वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख काकासाहेब सुकासे यांनी मानले.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८१७ : इंग्रज व दुसरे बाजीराव यांच्या लढाईत इंग्रजांकडून बाजीरावाच्या सैन्याचा पराभव झाला.
१८२४ : अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात जगातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू झाले.
१८४३ : विष्णुदास अमृत भावे स्वरचित सीता स्वयंवर या मराठीतील पहिल्या नाटकाचा पहिला प्रयोग सांगली येथे सदर केला.
१८७२ : महिलांना मतदानाचा अधिकार नसताना अमेरिकेत सुसान अँथनी या महिलेने मतदान केल्यामुळे तिला १०० डॉलर दंड करण्यात आला.
१८९५ : जॉर्ज बी. सेल्डेन यांना ऑटोमोबाइलसाठी पहिले अमेरिकेचे पेटंट भेटले.
१९२९ : जी. आय. पी. रेल्वे कंपनीने मुंबईहून पुण्यापर्यंतच्या लोहमार्गावरून आगगाड्याऐवजी विजेवर चालणा-या गाड्यांचा प्रारंभ केला.
१९४० : फ्रँकलिन डी. रूझवेल्ट हे तिसऱ्यांदा निवडून आलेले. एकमेव राष्ट्रपती आहेत.
१९४५ : कोलंबियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
१९५१ : बी. बी. सी. आय.रेल्वे आणि सौराष्ट्र रेल्वे, राजपुताना रेल्वे, जयपूर रेल्वे व कच्छ रेल्वे यांचे विलिणीकरण करुन पश्चिम रेल्वे ची स्थापना करण्यात आली.
२००६ : इराकचे माजी अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.
२००७ : गुगलने ने ॲंडरॉइड मोबाइल ऑपरेटिंग सिस्टमचे अनावरण केले.
२०१३ : भारताने मंगळ ऑर्बिटर मोहिमेची सुरूवात केली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७० : स्वातंत्र्य चळवळीतील नेते चित्तरंजन दास यांचा जन्म. (मृत्यू: १६ जून १९२५)
१८८५ : अमेरिकन इतिहासकार व तत्त्वज्ञ विल डुरांट यांचा जन्म. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९८१)
१८९२ : इंग्रजी-भारतीय अनुवांशिक आणि जीवशास्त्रज्ञ जे. बी. एस. हलदाणे यांचा जन्म. (मृत्यू: १ डिसेंबर १९६४)
१९०५ : भारतीय लेखक आणि कवी सज्जनद झहीर यांचा जन्म. (मृत्यू: १३ सप्टेंबर १९७३)
१९०८ : तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व लेखक, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते प्रा. राजा राव यांचा जन्म. (मृत्यू: ८ जुलै २००६ ऑस्टिन, न्यू जर्सी, यु. एस. ए.)
१९१३ : ब्रिटिश अभिनेत्री विवियन लेह यांचा जन्म. (मृत्यू: ८ जुलै १९६७)
१९१७ : स्वातंत्र्यसैनिक व हरयाणाचे मुख्यमंत्री बनारसी दास गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑगस्ट २००७)
१९२१ : ललित कलादर्श ह्या नाट्यसंस्थेचे प्रमुख व संगीत नाटक कलावंत व गायक भालचंद्र पेंढारकर यांचा जन्म.
१९२९ : गीतकार व सर्जनशील कवी प्रा. योगेश्वर अभ्यंकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ नोव्हेंबर २०००)
१९३० : भारतीय नेते अर्जुनसिंह यांचा जन्म. (मृत्यू: ४ मार्च २०११)
१९३२ : पक्षी, वन्याजीवनविषयक ग्रंथकार मारुती चितमपल्ली यांचा सोलापूर येथे जन्म.
१९५२ : भारतीय तत्त्ववेत्ता आणि लेखक वंदना शिवा यांचा जन्म.
१९५५ : पत्रकार करन थापर यांचा जन्म.
१९८८ : क्रिकेटपटू विराट कोहोली यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७९ : प्रकाश हा विद्युत चुंबकीय तरंगांनी बनलेला असतो असा सिद्धांत मांडणारे ब्रिटिश पदार्थवैज्ञानिक व गणितज्ञ जेम्स क्लार्क मॅक्सवेल यांचे निधन. (जन्म: १३ जून १८३१ एडिंबर्ग, यु. के.)
१९१५ : राष्ट्रीय सभेचे संस्थापक व मुंबईचा सिंह उर्फ फिरोजशहा मेरवानजी मेहता यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८४५)
१९५० : चतुरंग गवई फय्याझ खाँसाहेब यांचे निधन.
१९९१ : कथालेखिका व कादंबरीकार शकुंतला विष्णू गोगटे यांचे निधन.
२०११ : संगीतकार व गायक भूपेन हजारिका यांचे निधन. (जन्म: ८ सप्टेंबर १९२६)

नारळ पिकातील अन्नद्रव्य आणि पाण्याचे व्यवस्थापन



नारळ हे बागायती फळ झाड असून पाण्याची सोय असल्यास कुठल्याही प्रकारच्या म्हणजे समुद्र किंवा नदीकाठच्या रेताळ, वरकस व मुरमाड तसेच मध्यम, भारी आणि अति भारी जमिनीत देखील लागवड करता येते. परंतु प्रत्येक प्रकारच्या जमिनीत पूर्वतयारी करताना काळजी घ्यावी लागते. ज्या जमिनीत पावसाळ्यात पाणी लवकर निघून जात नाही, अशा पाणथळ जमिनीत नारळाची लागवड करावयाची असल्यास अशा जमिनीत चर काढून पाणी बाहेर काढणे महत्वाचे असते. त्याचप्रमाणे नदीकाठच्या जमिनीत पावसाळ्यात पाणी काही काळ आत शिरते. अशा जमिनीत पावसाचा जोर ओसरला यावर म्हणजेच ऑगस्ट सप्टेंबर मध्ये लागवड करावी. या लेखात आपण नारळ पिकातील अन्नद्रव्यांचे महत्त्व आणि त्यांची व्यवस्थापन तसेच पाण्याचे व्यवस्थापन याबद्दल माहिती घेणार आहोत.

नारळाचे पाणी व्यवस्थापन :नारळ पिकास पाण्याचा जास्त ताण पडल्यास माध्यम फुलांची गळ होते व फळ धारणेवरती त्याचा विपरीत परिणाम पाहायला मिळतो. त्याकरिता बागेत पुरेसा ओलावा टिकून राहणे आवश्यक आहे. पाणी देण्यासाठी बुंध्याजवळ दीड ते दोन मीटर अंतरावर गोलाकार किंवा चौरस आळे करून पाणी द्यावे.

जर तुमच्याकडे ठिबक सिंचन असेल व त्याद्वारे पाणी द्यायचे असेल तर त्यासाठी वरील प्रमाणे अंतरावर गोलाकार किंवा चौरस लॅटरल पाईप टाकून त्याला किमान पाच ते सहा ड्रीपर लावावेत. लहान रोपास प्रतिदिन १० लिटर पाणी द्यावे. मोठ्या झाडांना ठिबक सिंचनाद्वारे ऑक्टोबर ते जानेवारीमध्ये प्रति दिन ३० लिटर पाणी द्यावे. फेब्रुवारी ते मे पर्यंत प्रति दिन ४० लिटर पाणी आवश्यक असते.

नारळ पिकाचे अन्नद्रव्य व्यवस्थापन :नारळ फळपिकाच्या एक वर्षाच्या झाडांना खते देण्यासाठी बुंध्यापासून ३० सेमी अंतरावर, ३० सेंटिमीटर रुंद व ३० सेंटिमीटर खोल गोलाकार चर द्यावा. चरामध्ये शेणखत, रासायनिक खत यांचे मिश्रण टाकावे. चर मातीने बुडवून पाणी द्यावे. रोपे जशी मोठे होतील तसेच चर बुंध्यापासून दूर घ्यावा. पाच वर्षावरील झाडांसाठी दीड मीटर अंतरावर चर द्यावा. साधारणपणे एक वर्षाच्या झाडाला १० ते १५ किलो शेणखत किंवा गांडूळखत,५०० ग्रॅम युरिया,६०० ग्रॅम सुपर फॉस्फेटव ३२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे. या प्रमाणामध्ये खताचे प्रमाण वाढवावे व पाच वर्षांपूर्वी झाडाला ५० ते ७० किलो शेणखत किंवा गांडूळखत, २५०० ग्रॅम युरिया, ३००० ग्रॅम सुपर फॉस्फेट व सोळाशे ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे. जर संकरित जात असेल तर म्युरेट ऑफ पोटॅश पालाशची मात्रा दुप्पट करण्याची शिफारस करण्यात आली आहे. नारळाच्या चांगल्या वाढीसाठी दर सहा महिन्याला ५० ग्रॅम ऍझोस्पिरीलम, ५० ग्रॅम फोस्पॉ बॅक्टेरिया, ५० ग्रॅम व्ही ए एम जैविक खते शेणखतामध्ये एकत्र करून मुळांजवळ द्यावीत.जैविक खतांमध्ये रासायनिक खते मिसळू नयेत. माती परीक्षणानुसार झाडास दिड किलो सूक्ष्म द्रव्याची मात्रा तीन समान हप्त्यांत द्यावी. पहिला हप्ता जून मध्येतर दुसरा हप्ता आक्टोबर आणि तिसरा हप्ता जानेवारी महिन्यात द्यावा.

सेंद्रिय नाशपाती वाढवण्यासाठी लागवड



बिया आणि कलमांपासून सेंद्रिय नाशपाती वाढवण्याच्या विषयावर चर्चा करत आहोत. नाशपाती हे भारतातील समशीतोष्ण प्रदेशातील सर्वात महत्वाचे फळ पिकांपैकी एक आहे आणि फळांमध्ये प्रथिने आणि जीवनसत्त्वे भरपूर प्रमाणात असतात. नाशपातीची झाडे सहजपणे सेंद्रिय पद्धतीने वाढवता येतात कारण त्यांना निरोगी आणि कीटकमुक्त ठेवण्यासाठी कोणत्याही फवारणीची आवश्यकता नसते. फायर ब्लाइट रोग हा एकमेव रोग आहे जो नाशपातीच्या झाडांना आव्हान देतो, परंतु याचे निदान आणि व्यवस्थापन करणे सोपे आहे.

सेंद्रिय नाशपातीची झाडे वाढवणे हे नियमित नाशपातीच्या उत्पादनापेक्षा तीन महत्त्वाच्या बाबींमध्ये वेगळे आहे. ते म्हणजे खत घालणे, नाशपातीच्या कीटकांचे नियंत्रण करणे, विशेषतः कोडलिंग मॉथचे नियंत्रण करणे आणि नाशपातीच्या झाडावरील सामान्य रोग जसे की आगीमुळे होणारा करपा नियंत्रित करणे. नाशपातीच्या झाडाची लागवड करण्यापूर्वी सेंद्रिय बागेची तयारी सुरू करा, तुमच्या मातीसाठी सेंद्रिय सुधारणा करण्यासाठी कंपोस्टचा ढीग आणि नाशपातीच्या झाडांसाठी आच्छादन तयार करा.

भारतातील नाशपातीच्या झाडाचे उत्पादन : नाशपाती हे समशीतोष्ण हवामानातील एक सामान्य फळ आहे आणि फळे चवदार आणि आनंददायी असतात. नाशपातीची फळे जगभरात उत्पादित केली जातात आणि उन्हाळ्याच्या अखेरीस ऑक्टोबर महिन्यांत कापणी केली जातात. हवामान आणि मातीशी अधिक अनुकूलता असल्यामुळे नाशपातीची लागवड उपोष्णकटिबंधीय ते समशीतोष्ण प्रदेशात करता येते. भारतात, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर आणि उत्तर प्रदेशात नाशपातीची झाडे लावली जातात. नाशपातीची झाडे सफरचंदांपेक्षा थोडी कमी थंडी सहन करणारी असतात परंतु विविध हवामानात सेंद्रिय पद्धतीने वाढवणे सोपे असते. झोन ४ ते ७ मध्ये, हनीस्वीट किंवा मूनग्लो सारख्या आगीपासून बचाव करणाऱ्या नाशपातीच्या झाडाच्या जाती निवडा. झोन ५ ते ८ मध्ये, आशियाई नाशपातीची झाडे नियमित काळजी घेतल्यास सुंदर, कुरकुरीत मांसाची फळे देतात. बहुतेक टेबल-गुणवत्तेच्या नाशपाती पूर्णपणे पिकण्यापूर्वीच कापल्या पाहिजेत.झाडे वाढवण्यासाठी हवामानाची आवश्यकता : साधारणपणे, नाशपातीची झाडे समुद्रसपाटीपासून १२०० ते १८०० मीटर उंचीवर यशस्वीरित्या वाढवता येतात. ते ० सेल्सिअसपेक्षा कमी तापमान सहन करू शकते आणि उन्हाळ्यात (४७ सेल्सिअस) उच्च तापमान सहन करू शकते. त्याच्या फुलांच्या आणि फळधारणेसाठी सर्वोत्तम तापमान पातळी हिवाळ्यात २ सेल्सिअस आणि उन्हाळ्यात ३२ सेल्सिअस असते. नाशपातीच्या झाडाच्या वाढीसाठी १००-१२५ सेमी पाऊस पुरेसा असतो. उन्हाळा कमी आर्द्रता असलेला असावा आणि परिपक्वतेच्या टप्प्यावर पाऊस पडला तर फळे चांगली वाढतात.

शेतकऱ्यांना फायदेशीर वरई (भगर) चे सुधारित लागवड तंत्रज्ञान

जमीन :वरई, वरी, कुटकी या पिकाच्या लागवडीसाठी हलकी ते मध्यम, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन उत्तम आहे. या पिकाची लागवड प्रामुख्याने महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत रांगेतील अतिपावसाच्या उप-पर्वतीय विभाग, पश्चिम घाट विभाग आणि कोकण विभागातील डोंगर उताराच्या जमिनीवर केली जाते.

पूर्वमशागत :जमिनीची खोल नांगरट करुन उभ्या आडव्या कुळवाच्या दोन पाळ्या देऊन ४ ते ५ टन शेणखत/कंपोस्ट खत याचवेळी शेतात मिसळून जमीन भुसभुशीत करावी. पूर्वी घेतलेल्या पिकाचे धसकटे, काडीकचरा व बहुवार्षिक गवताचे अवशेष वेचून शेत स्वच्छ करावे.

सुधारित वाण : फुले एकादशी हे वाण १२० ते १३० दिवसांमध्ये परिपक्व होते. याची उत्पादकाता हेक्टरी ११ ते १२ क्विंटल असते. हे उशीरा पक्व होणारे व उंच वाढणारे वाण आहे. कोकण सात्विक हे वाण ११५ ते १२० दिवसांमध्ये परिपक्व होते. याची उत्पादकाता हेक्टरी १८ ते २० क्विंटल असते. हे मध्यम पक्वता व अधिक उत्पादकता देणारे पिक आहे.

बियाणे व पेरणीची पद्धत :पिकाची लागवड मुख्यत्वे रोप लागण पद्धतीने केली जाते. रोप लागण पद्धतीने लागवड करायची असल्यास ४ ते ५ किलो बियाणे/हेक्टरी वापरावे. रोपवाटिका करताना गादीवाफे तयार करून त्यावर बियाणे ओळीमध्ये पेरून घ्यावे. बियाणे १ ते १.५ से. मी. पेक्षा जास्त खोल जाणार नाहीत याची काळजी घ्यावी म्हणजे उगवण चांगली होते.



बीज प्रक्रिया :बियाणे पेरणीपूर्वी 'अझोस्पिरिलम ब्रासिलेंस' आणि 'अस्पर्जीलस अवामोरी' या जिवाणू संवर्धकाची प्रति किलो बियाण्यास २५ गॅम प्रमाणे करावी.

रोप लावणी पद्धत :गादी वाफ्यावर रोपे २० ते २५ दिवसांची झाल्यानंतर शेतामध्ये रोपांची पुनर्लागण करावी. रोपलागण करताना दोन ओळीमधील अंतर ३० से.मी. (एक फूट) व दोन रोपामंधील अंतर १० से.मी. ठेवावे.

खत व्यवस्थापन :पेरणीपूर्वी एक महिना अगोदर शेणखत अथवा कंपोष्ट खत ५ ते १० टन प्रति हेक्टर या प्रमाणे जमिनीत मिसळून द्यावे. या पिकासाठी रासायनिक खताची मात्रा ४० किलो नत्र, २० किलो स्फूरद आणि २० किलो पालाश प्रति हेक्टर याप्रमाणे द्यावे. अर्धे नत्र व संपूर्ण पालाश व संपूर्ण स्फुरद मात्रा पेरणी करताना द्यावी व उरलेले अर्धे नत्र पेरणी नंतर एक महिन्याने द्यावे.

आंतरमशागत :पीक वाढीच्या सुरुवातीच्या काळात पिकाची वाढ संथ गतीने होत असल्याने तणे पिकाशी स्पर्धा करतात.त्यामुळे तण नियंत्रणासाठी एक कोळपणी करुन गरजेनुसार एक महिन्याच्या आत एक खुरपणी करावी.

आंतरपिके शिफारस :पिकाचे अधिक धान्य उत्पादन आणि निव्वळ नफा मिळविण्यासाठी उप-पर्वतीय विभागात वरी/ वरई पिकामध्ये कारळा ४:१ या प्रमाणात आंतरपीक घेण्याची शिफारस करण्यात आली आहे.

पीक संरक्षण, खोडमाशी कीड व्यवस्थापन :पेरणीनंतर पीक ६ आठवड्याचे असताना खोडमाशीचा प्रादुर्भाव सुरु होतो. या किडीच्या अळीद्वारे मुख्य खोडाचे नुकसान होऊन मर होते. त्यामुळे फुटव्यावर परिणाम होतो. सर्वाधिक नुकसान जुलै महिन्याच्या शेवटी व ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला जाणवते.

उपाययोजना :पावसाळा सुरु होताच ७ ते १० दिवसांच्या आत पेरणी करावी. तसेच पेरणीकरिता जास्त बियाणे वापरावे.

काढणी व मळणी :पिकाच्या विविध वाणानुसार पक्वता कालावधी वेगळा असू शकतो. साधारणपणे १०० ते १२० दिवसांत पीक काढणीस सुरुवात करावी. काढणीस उशीर झाल्यास कणसातील/ बोंडातील दाणे झडण्याची शक्यता असते. पिकाची काढणी करताना कणसे/बोंडे विळ्याने कापून करावी. दोन-तीन दिवस उन्हात चांगली वाळल्यानंतर कणसे बडवून मळणी करावी. धान्य उन्हात चांगले वाळवून हवेशीर जागी साठवण करुन ठेवावे.

उत्पादन : वरी/कुटकी पीक हे लागवड करताना वापरण्यात येणाऱ्या सुधारित निविष्ठा व तंत्रज्ञानास उत्तम प्रतिसाद देणारे उ४ वर्गातील पीक आहे. या पिकापासून सरासरी हेक्टरी १३ ते १५ क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन घेता येते.

पूसा नवरंग द्राक्ष वाण; ज्यूस, वाईनसाठी प्रसिद्ध, मिळते भरघोस उत्पादन!

राज्यात द्राक्ष पिकाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात आहे. नाशिक व सांगली जिल्हा द्राक्ष उत्पादनासाठी विशेष प्रसिद्ध आहे. इतकेच नाही राज्यातील अन्य भागांमध्येही कमी अधिक प्रमाणात द्राक्षाचे उत्पादन घेतले जाते. पावसाने आणि वातावरणाने साथ दिली नसली तरी शेतकऱ्यांनी चांगले उत्पादन घेतले आहे. द्राक्ष शेतीतून अधिक नफा मिळवण्यासाठी, त्याची अधिक उत्पादन देणारी जात निवडणे खूप गरजेचे असते.

पूसा नवरंग वाणाची वैशिष्ट्ये : पूसा नवरंग असे या द्राक्ष वाणाचे नाव असून, भारतीय कृषी संशोधन संस्थेकडून (आयसीएआर) तिची निर्मिती करण्यात आली आहे. हे द्राक्ष वाण उत्पादन देण्यासह लवकर काढणीला येते. या वाणाच्या झाडाला येणाऱ्या द्राक्षांचा आकार हा मध्यम असतो. पूसा नवरंग ही द्राक्षाची संकरित जात असून, तिचे फळ हे बीजरहित असते. याशिवाय या वाणाच्या द्राक्षांचा रंग हा काळा असतो. माती परीक्षण किट : या द्राक्ष वाणाचा उपयोग हा ज्यूस आणि वाईन बनवण्यासाठी केला जातो. महाराष्ट्रात याच द्राक्ष वाणाच्या मदतीने पुणे येथील राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्राने पूसा नवरंग आणि फ्लेम सिडलेस जातीच्या संकरण प्रक्रियेतून मांजरी मेडिका ही जात विकसित केली आहे. जी राज्यात ज्यूस निर्मितीसाठी विशेष प्रसिद्ध आहे. अन्य महत्वाचे द्राक्ष वाण : थॉमसन सिडलेस, तास-ए-गणेश, सोनाका, माणिक चमन, शरद सिडलेस, फ्लेम सिडलेस व रेडग्लोब ही महाराष्ट्रातील प्रसिद्ध आणि अधिक उत्पादन मिळवून देणारी द्राक्ष वाण आहेत. तर अलीकडे नाशिक येथील सह्याद्री फार्म्स या शेतकरी उत्पादक संस्थेकडून 'आरा' हे द्राक्ष वाण विकसित करण्यात आले आहे. हे देखील उत्पादन मिळवून देणारे वाण आहे. या वाणाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे इतर सर्व वाणांपेक्षा त्याला निर्यातीसाठी मागणी असल्याने, त्याला अधिकच दर मिळतो.

महाराष्ट्रात ७० टक्के उत्पादन : भारतीय फळबाग शेतीमध्ये द्राक्ष फळपिकाला मोठे स्थान आहे.

नव्या सिंथेटिक ट्रॅकवर सराव करणारे खेळाडू देशासाठी पदके जिंकतील-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

विभागीय क्रीडा संकुलात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक सिंथेटिक ॲथलेटिक्स ट्रॅकवर सराव करणाऱ्या मुला-मुलींमधून भविष्यात भारतासाठी पदके जिंकणारे खेळाडू घडतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे ४०० मीटर सिंथेटिक ॲथलेटिक्स ट्रॅक, फुटबॉल मैदान, स्टेडियम मास्ट (फ्लड लाईट्स) व युवा वसतिगृहाचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरमध्ये सुंदर सिंथेटिक ट्रॅक व फ्लड लाईट्सची सुविधा उपलब्ध झाली आहे. या मैदानावर सराव करणारा एखादा मुलगा किंवा मुलगी भविष्यात भारतासाठी पदक मिळवेल, असा मला विश्वास आहे. या क्रीडासुविधांच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या विभागीय क्रीडा संकुल समिती व



क्रीडा विभागाचे त्यांनी अभिनंदन केले. तसेच उपस्थित खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, आमदार सुहास शिरसाट, अनुराधा चव्हाण, नारायण कुचे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी, क्रीडाप्रशिक्षक व खेळाडू उपस्थित होते.विभागीय क्रीडा संकुलात १२ कोटी ७५ लाख रुपये खर्चून आठ लेनचा ४०० मीटर सिंथेटिक ॲथलेटिक्स ट्रॅक व नैसर्गिक हिरवळीचे फुटबॉल मैदान विकसित करण्यात आले आहे. १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेसाठी दहा लेन उपलब्ध आहेत. या सुविधांमुळे धावणे, अडथळा शर्यती, रिले, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, भालाफेक यांसारख्या विविध क्रीडाप्रकारांचा सराव व स्पर्धा घेता येणार आहेत. फुटबॉल मैदानावर आधुनिक स्प्रिंकलर सिंचन यंत्रणाही बसविण्यात आली आहे.

दहा हजार प्रेक्षक क्षमतेच्या स्टेडियममध्ये चार उंच मास्टवर प्रत्येकी २२ याप्रमाणे एकूण ८८ दिव्यांची प्रकाशव्यवस्था करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी ११ कोटी ६७ लाख ४२ हजार रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. फ्लड लाईट्समुळे सायंकाळच्या वेळेतही खेळाडूंना सराव व स्पर्धांचे आयोजन करता येणार आहे.खेळाडूंच्या निवासासाठी चार कोटी रुपयांच्या निधीतून युवा वसतिगृह उभारण्यात आले आहे. यामध्ये १६ खोल्या, परिषद सभागृह, स्वयंपाकगृह, भोजनगृह, ग्रंथालय व वाचन कक्षाच्या सुविधा उपलब्ध आहेत.लोकार्पणानंतर नूतन सिंथेटिक ट्रॅकवर मुली व मुलांच्या १०० मीटर प्रदर्शनी धावण्याच्या स्पर्धा घेण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्लॅप देऊन दोन्ही स्पर्धांना प्रारंभ केला. राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांत सहभागी झालेल्या शहरातील खेळाडूंनी यामध्ये सहभाग घेतला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंशी संवाद साधून त्यांच्यासमवेत छायाचित्रही काढले.यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत व क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांच्या हस्ते मुख्यमंत्री फडणवीस यांना सिंथेटिक ट्रॅकची प्रतिकृती, अजिंठा-वेरूळ शिल्प असलेले सन्मानचिन्ह व त्यांच्या नावाच्या इंग्रजी आद्याक्षरांवर आधारित 'डीएफ' क्रीडा साहित्य संच भेट देण्यात आला.नव्या सुविधांमुळे मराठवाड्यातील खेळाडूंना दर्जेदार सराव, प्रशिक्षण व निवासाची व्यवस्था एकाच ठिकाणी उपलब्ध झाली असून, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांच्या आयोजनालाही चालना मिळणार आहे.

वसुंधरा नगरमध्ये वरद फॅशन मॉलचा मनमानी कारभार

विनापरवानावृक्षतोड,सर्व्हिस रोडवर अतिक्रमण; नागरिकांचे आरोग्य धोक्यात महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त

जालना । प्रतिनिधी

शहरातील देऊळगावराजा रोडवरील वसुंधरा नगर परिसरात नुकतेच उद्घाटन झालेल्या वरद फॅशन मॉलच्या कामकाजामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मॉलच्या बांधकामादरम्यान कॉलनीअंतर्गत असलेल्या सर्व्हिस रोडलगतची मोठी झाडे विनापरवाना तोडण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, रस्त्यालगतच्या नाल्यासाठी आवश्यक जागा न सोडता अतिक्रमण करण्यात आल्याने परिसरातील नागरी सुविधांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, वसुंधरा नगर येथील कॉलनीअंतर्गत रस्त्याच्या बाजूने सांडपाणी वाहून जाण्यासाठी नालीची व्यवस्था असणे आवश्यक असताना, वरद फॅशन मॉलच्या बांधकामादरम्यान त्यासाठी पुरेशी जागा सोडण्यात आली नसल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी सांडपाण्याचा निचरा होण्याचा मार्ग अडविला गेला आहे. विशेष म्हणजे, कॉलनीतील नागरिकांनी स्वखर्चाने सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी सिमेंटचे पाइप टाकले होते. मात्र, मॉलच्या कामादरम्यान हे पाइप दाबले गेल्यामुळे सांडपाणी पुढे वाहून जाण्याऐवजी परिसरातील रिकाम्या प्लॉटमध्ये साचत आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मोठ्या वृक्षांची कत्तल; पर्यावरणाचेही नुकसान

मॉलचे बांधकाम सुरू असताना रस्त्याच्या कडेला असलेली मोठी झाडे तोडण्यात आल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. शहरात एकीकडे वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणासाठी विविध उपक्रम राबविले जात असताना, दुसरीकडे कोणतीही परवानगी न घेता झाडांची कत्तल करण्यात आली असल्यास ही बाब गंभीर आहे. संबंधित वृक्षतोडीस परवानगी होती किंवा नाही, याची महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. बांधकाम साहित्य रिकाम्या प्लॉटमध्ये; रस्त्यावर वाहनांचे अतिक्रमण मॉलच्या बांधकामाचे साहित्य परिसरातील रिकाम्या प्लॉटमध्ये टाकण्यात आल्यामुळे स्थानिक रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय सर्व्हिस रोडवर वाहने आडवी लावून रस्ता अडविण्यात येत असल्याने नागरिकांची ये-जा करणेही अवघड झाले आहे. सार्वजनिक रस्त्याचा वापर अशा प्रकारे अडविण्याचा अधिकार संबंधितांना कोणी दिला, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. ❊महानगरपालिकेच्या कारभारावर नागरिकांचे प्रश्नचिन्ह या सर्व प्रकाराबाबत परिसरातील नागरिकांनी महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना माहिती दिली असतानाही अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याची तक्रार आहे. विशेष म्हणजे, नागरिकांनी तक्रार केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडूनच घटनास्थळावरील कामाचे फोटो पाठविण्यास सांगण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्रत्यक्षात एवढ्या मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू असताना महानगरपालिकेचा एकही कर्मचारी घटनास्थळी पाहणीसाठी आला नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ❊अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळेच अतिक्रमणाला अभय मिळतेय का शहरात सामान्य नागरिकांनी किरकोळ बांधकाम केले तरी महानगरपालिकेकडून नियमांचा बडगा उगारला जातो. मात्र, मोठ्या व्यावसायिक आस्थापनांकडून सार्वजनिक रस्ते, नाल्या आणि पर्यावरणाशी संबंधित नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी समोर येऊनही कारवाई का होत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे. या संपूर्ण प्रकरणात प्रशासनाचे दुर्लक्ष आहे की संबंधितांना अप्रत्यक्ष अभय दिले जात आहे, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. दरम्यान, महानगरपालिका आयुक्तांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी करावी, सर्व्हिस रोडवरील अतिक्रमण हटवावे, सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था पूर्ववत करावी, बांधकाम साहित्य हटविण्याचे आदेश द्यावेत तसेच वृक्षतोडीच्या परवानगीची तपासणी करून दोषींवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी वसुंधरा नगरमधील नागरिकांकडून होत आहे.

देशाची एकता अखंडता हेच भारताचे सामर्थ्य आहे त्याचे रक्षण करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे -भास्कर दानवे

जालना । प्रतिनिधी

भारताचे पहिले उपपंतप्रधान व पहिले गृहमंत्री, भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी, जालना महानगरच्या वतीने एकता दौडचे आयोजन आज दि. ३१ ऑक्टोबर २०२६ शनिवार रोजी करण्यात आले, ही एकता दौड भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथन सुरू होऊन लक्कडकोट-बसस्थानक-मामा चौक-महावीर चौक-सुभाषचंद्र बोस चौक मार्गे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून राष्ट्रगीताने एकता दौड ची सांगता झाली. यावेळी माजी आ.कैलास गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सभापती अशोक पांगारकर, गटनेते महेश निकम, संगीताताई गोरंटयाल,



मा.जिल्हाध्यक्ष सतीश जाधव, जिल्हा सरचिटणीस अरुणा जाधव, वसंत शिंदे, अमोल कारंजेकर, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष गोविंद भताने, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगी देशपांडे, संध्याताई देठे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचा गौरव केला. देशाची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी सरदार पटेल यांनी केलेले कार्य अतुलनीय असून त्यांच्या विचारांची आजच्या काळातही तितकीच आवश्यकता आहे. भारताची विविधतेतील एकता हीच देशाची खरी ताकद आहे. जात, धर्म, भाषा आणि प्रांत यापलीकडे जाऊन प्रत्येक भारतीयाने राष्ट्रहिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकता दिवसाच्या माध्यमातून नव्या पिढीमध्ये देशभक्ती, राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक एकात्मतेची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याचे स्मरण करून सांगितले की, सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यानंतर देशातील विविध संस्थानांचे एकत्रीकरण करून अखंड भारताच्या निर्मितीत ऐतिहासिक योगदान दिले. त्यांची राष्ट्रनिष्ठा, दृढ इच्छाशक्ती आणि देशाच्या एकतेसाठी केलेले कार्य प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेली एकता दौड ही देशाच्या एकात्मतेचा आणि अखंडतेचा संकल्प करणारा उपक्रम आहे. सरदार पटेल यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत देशाच्या विकासासाठी आणि राष्ट्रहितासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी शिवाजी शेजूळ, सिद्धिविनायक मुळे, आनंद झाड, भगवान चांदोडे, अर्जुन गेही, विनोद रत्नपारखे, सोपान पेंढारकर, देविदास देशमुख, विजय कामड, आदींसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शासनकर्त्यांनो, गोरबंजारांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका-प्रा. संदेश चव्हाण

मंठा । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील गोरबंजारा समाज आपल्या भावी पिढ्यांचे भवितव्य सुरक्षित करण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी संघर्ष करीत आहे. मात्र, वारंवार आंदोलने, मोर्चे, उपोषणे आणि निवेदने देऊनही शासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने समाजातील असंतोष आता उफाळून आला आहे. ''गोरगरीब गोरबंजारा समाजाच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. एसटी आरक्षण देणे शक्य नसेल तर सत्तेतून पायउतार व्हा,'' असा आक्रमक इशारा गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांनी राज्य सरकारला दिला.

मंठा येथील विडोळी फाटा येथे सकल गोरबंजारा समाजाच्या वतीने प्रा. संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आयोजित रास्ता



रोको आंदोलनात ते बोलत होते. यावेळी बोलताना प्रा. चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी आतापर्यंत लाखोंच्या संख्येने ५७ महामोर्चे काढण्यात आले. १७ युवकांनी आमरण उपोषण केले, तर सात नवतरुणांनी आरक्षणाच्या मागणीसाठी आत्मबलिदान दिले. गोरसेनेच्या हजारो कार्यकर्त्यांनी समृद्धी महामार्ग रोखून शासनाचे लक्ष वेधले. याशिवाय साखळी उपोषणे आणि विविध आंदोलनेही करण्यात आली. एवढा मोठा संघर्ष करूनही शासन आणि प्रशासनाला जाग येत नसेल, तर हा समाजाचा नव्हे तर शासनाच्या संवेदनशीलतेचा प्रश्न आहे, अशी टीकाही त्यांनी केली. गोर बंजारा बांधवांनी विडोळी फाट्यापर्यंत पायी मोर्चा काढत महामार्गावर चक्काजाम करण्यात आला. या आंदोलनात हजारोंच्या संख्येत आंदोलक सहभागी झाल्याचा आयोजकांचा दावा आहे. तब्बल तीन तास रास्ता रोको करण्यात आल्याने जिंतूर-जालना महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी समाज बांधवांच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले या निवेदनावर सुभाष राठोड , गोविंद राठोड ,भीमराव राठोड, अर्जुन राठोड, बंडू राठोड, ज्ञानेश्वर राठोड ,नारायण पवार, रवी पवार ,विनोद जाधव ,तातेराव राठोड ,किरण पवार ,संजय जाधव ,मनोज राठोड ,अमोल राठोड ,राहुल राठोड, युवराज राठोड ,काळू राठोड ,संदीप जाधव ,राजू पवार यांच्यासह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पणतीने पणती पेटवत जीवनातील अंध:कार प्रकाशमय करत दिवाळी साजरी करण्याचा चिमुकल्यांचा संकल्प

पाथर्डी । प्रतिनिधी

स्वत:च्या जीवनातील दु:ख भावनिक कोरडेपणा बाजूला ठेवून इतरांच्या जीवनामध्ये आनंदाचे क्षण निर्माण करण्यासाठी येथील निवासी मतिमंद विद्यालय व मतिमंद मुलांचे बालगृहामधील विद्यार्थ्यांनी दिवाळीसाठी लहान मोठे आकाश कंदील मेणाच्या पणत्या आकर्षक लक्ष्मी मूर्ती अन्य सजावट साहित्य शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली बनवले आहे या उपक्रमामुळे अंधारात चाचपडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनातही जगण्याचा नवा प्रकाश आत्मविश्वासाच्या रूपाने निर्माण होत आहे पाथर्डी शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर निवासी मतिमंद विद्यालय आहे गेल्या बारा वर्षांपासून या विद्यालयाचे विद्यार्थी दिवाळीसाठी स्वत:च्या हाताने सजावटीचे साहित्य तयार करतात दीपोत्सवासाठी आकाश कंदील विविध प्रकारच्या पणत्या सजावट साहित्य सुमारे दोन महिन्यांपासून परिश्रम तयार करतात



अत्यंत आकर्षक असे पॅकिंग त्यासाठी करण्यात येते या विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या आकाश कंदीलाला ग्राहकाची चांगली पसंती मिळते यासाठी लागणारा कच्चामाल पुण्यावरून आणला जातो विद्यालयातील विषय शिक्षक व कलाशिक्षक हेच यांचे विश्व बनल्याने तुम्हीच आमचे मायबाप अशा भावनेने विद्यार्थी येथे जीवन जगतात ईश्वराने प्राण दिला पण त्यासाठी धडधाकट शरीर व विचार करणारा मेंदू मात्र कमकुवत ठेवला या गोष्टीवर रडत बसण्यापेक्षा जीवन आनंद मिळवण्याच्या अनेक वाटा शिक्षक व संस्थाचालकांच्या संयुक्त प्रयत्नाने येथे शोधल्या जातात शहरातील बहुतेक नागरिक वैयक्तिक आनंदाच्या प्रसंगी अथवा सणावाराच्या दिवशी येथील विद्यार्थ्यांना मीष्टांना भोजन देतात काही जणांकडून नाश्ता दिला जातो त्यावेळी शहरातून येणाऱ्या नागरिकांनी पासून काहीसे बाजूला जात ही सर्व मुले एकमेकात राहतात शहाण्या माणसांपासून स्वत:ला दूर ठेवतात प्रत्येकाला काहीतरी व्यंग आहे मात्र त्यावर मात करत ती व्यक्ती आपल्याकडे बघून ज्यावेळी हसते त्यावेळी आपण अंतर्मुख होतो ईश्वराने आपल्याला सर्व काही दिले आहे तरीही जीवनासक्ती सुटत नसल्याने खरे मतिमंद आपण ठरतो जो मतीमंद आहे तो तर जगण्याची धडपड करतो आहे ईश्वराला दोष देत नाही नशिबाला दोष देत नाही आले जीवन वाट्याला नाही आनंदा तोट्याला उक्तीप्रमाणे प्रमाणे जगून वर करणी चांगल्या वाटणाऱ्या माणसांचा आदर्श बनत आहे दिवाळीचा सण आनंदाचा मांगल्याचा पावित्र्याचा व सहवासातील प्रत्येकाच्या जीवनामध्ये आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा म्हणून ओळखला जातो धावपळीच्या जीवनामध्ये माणूस आत्मकेंद्री झाला सभोवतालच्या वातावरणाचा त्याला विसर पडला भोगवादी प्रवृत्तीमुळे परोपकारी प्रवृत्ती लोप पाऊन माणुसकीचा झरा आटला या सर्वांवर मात करत मतिमंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चार दोन रुपये कमावण्यासाठी असा उपक्रम हाती घेतला असे म्हणण्यापेक्षा आपल्यामध्ये कुठल्याच प्रकारची उणीव नाही आपण काहीतरी करू शकतो भविष्यामध्ये एकट्याला जगण्याची वेळ आली तरी आपण जगू शकतो असा नवा आत्मविश्वास जागवणारा उपक्रम म्हणून याकडे बघावे लागेल शाळेच्या भिंतीच्या आतून या मुलांचे विश्व म्हणजे खरे खरे आनंदवन वाटून येथे शहाण्या माणसांना सुद्धा मन:शांती मिळते विद्यार्थ्यांनी मोठे आकाश कंदील ६०० मेणाच्या पणत्या २५० पॉकेट आकर्षक लक्ष्मी मूर्ती १०० छोटे आकाश कंदील पाचशे पॉकेट अन्य सजावट साहित्य बनवले आहे संस्थेच्या अध्यक्ष अनिता निराळी मुख्याध्यापक सचिन तरवडे व्यवस्थापक प्रताप निराळी अधीक्षक संभाजी झावरे प्रभारी मुख्याध्यापक नितेश मेघनर व सर्व कर्मचारी या कामांमध्ये विद्यार्थ्यांना मदत करतात.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ३४ वातानुकूलित ई-बसचे लोकार्पण



छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

शहरातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, आरामदायी व पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उपलब्ध करण्यात आलेल्या ३४ वातानुकूलित इलेक्ट्रिक बसचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते या बससेवेसह महानगरपालिकेच्या विविध विकासप्रकल्पांचा लोकार्पण शिलाफलकांचे अनावरण करण्यात आले.यावेळी सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, आमदार सुहास शिरसाट, अनुराधा चव्हाण, नारायण कुचे, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., महापौर समीर राजूरकर, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, क्रीडा व युवक सेवा विभागाचे उपसंचालक शेखर पाटील यांच्यासह लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महानगरपालिकेच्या शहर बससेवेत नव्याने समाविष्ट झालेल्या या वातानुकूलित इलेक्ट्रिक बसमुळे प्रवाशांना अधिक आरामदायी व सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. सोमवार, दि. २ नोव्हेंबरपासून या बस प्रवासी सेवेत दाखल होणार असून शहरातील विविध मार्गांवर त्यांचे संचालन करण्यात येणार आहे.या बस नऊ मीटर लांबीच्या असून प्रत्येकी ३२ प्रवासी आसनांची व्यवस्था आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
बुधवार दि.०४ नोव्हेंबर २०२६ | ६

धारूर किल्ल्याच्या संवर्धन कामावर अभियंत्यांचे व्हॉट्सप वरुन नियंत्रण

प्रत्यक्ष पाहणीऐवजी नेमलेल्या पहारेकरी कर्मचाऱ्याने पाठविलेल्या फोटोंवरून मार्गदर्शन; नऊ कोटींच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

धारूर । प्रतिनिधी

ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणाऱ्या धारूरच्या किल्ल्याच्या संवर्धनासाठी तब्बल ८ कोटी ९८ लाख ८७ हजार ७६० रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. महावारसा विशेष स्मारक योजनेतून सुरू असलेल्या या कामाला दोन महिन्यांचा कालावधी उलटला आहे. मात्र, एवढ्या मोठ्या खर्चाच्या कामावर प्रत्यक्ष देखरेख करण्याऐवजी पुरातत्त्व विभागाचे पहारेकरी कर्मचाऱ्याने व्हॉट्सपवर पाठविलेल्या फोटोंवरूनच मार्गदर्शन करीत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे. त्यामुळे ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाच्या नावाखाली सुरू असलेल्या कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



धारूरचा ऐतिहासिक किल्ला राज्य संरक्षित स्मारक असून त्याच्या संवर्धनासाठी शासनाने महावारसा विशेष स्मारक योजनेतून निधी उपलब्ध करून दिला आहे. नागपूर येथील बीएसएस कन्स्ट्रक्शन कंपनीला या कामाचे कंत्राट मिळाले आहे. अंबाजोगाई येथील परिचय आर्किटेक्ट या वास्तुविशारद संस्थेचा आराखडा आणि पुरातत्त्व विभागाच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली हे काम दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. किल्ल्यातील झाडेझुडपे हटविणे, कोसळलेली तटबंदी पुन्हा उभारणे, प्रवेशद्वाराची दुरुस्ती, चुनामिश्रित गिलावा, ग्राउटिंग, कंगोरे आणि फरशीची कामे प्रस्तावित आहेत.सध्या किल्ल्यात ढासळलेल्या तटबंदीचे बांधकाम आणि जुन्या भिंतींमधील सांधे भरण्याचे काम सुरू आहे. मात्र, या कामावर पुरातत्त्व विभागाच्या अभियंत्यांची प्रत्यक्ष देखरेख कितपत आहे, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. पुरातत्त्व विभागाने कॉन्ट्रॅक्ट बेस वर असलेल्या अनुपम गणगारे या पहारेकरी कर्मचाऱ्यांची कामाच्या पाहणीसाठी नियुक्ती केल्याचे सांगण्यात येते. ही व्यक्ती काम सुरू असताना मोबाईलमध्ये फोटो काढून संबंधित अभियंत्यांना व्हॉट्सपवर पाठविते. त्याच फोटोंच्या आधारे अभियंत्यांकडून मार्गदर्शन केले जात असल्याची माहिती पहारेकरी कर्मचाऱ्यानेच दिली. शनिवारी याबाबत अधिक चौकशी करण्याचा प्रयत्न केला असता संबंधित व्यक्तीने तेथून काढता पाय घेतला.

पूर्वीच्या चुकीची पुनरावृत्ती नको

यापूर्वीही दुसऱ्या कंत्राटदाराकडून झालेल्या कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण झाले होते. बांधण्यात आलेल्या तटबंदीच्या भिंती अवघ्या सहा महिन्यांत ढासळल्याने पुन्हा बांधकाम करण्याची वेळ आली होती. ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन करताना पारंपरिक बांधकाम पद्धती, योग्य साहित्य आणि तांत्रिक निकषांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे जुन्या चुकीची पुनरावृत्ती झाल्यास शासनाचा कोट्यवधींचा निधी वाया जाण्याची भीती आहे.

अभियंत्यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक

नऊ कोटींच्या जवळपास खर्चाच्या या कामाची जबाबदारी केवळ कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांवर सोपवून चालणार नाही. पुरातत्त्व विभागाच्या संबंधित अभियंत्यांनी नियमित प्रत्यक्ष पाहणी करावी, तर विभागाच्या संचालिका व वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही कामाला भेट देऊन गुणवत्तेची तपासणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. व्हॉट्सपवरील फोटोंवरून ऐतिहासिक किल्ल्याचे संवर्धन होणार असेल, तर प्रत्यक्ष देखरेखीची जबाबदारी कोण पार पाडणार, असा सवाल उपस्थित होत आहे. धारूरच्या ऐतिहासिक वैभवाचे जतन करण्यासाठी या कामाची स्वतंत्र गुणवत्ता तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी इतिहासप्रेमींकडून होत आहे.

मंझरी हवेली फाट्यावरील अपघात रोखण्यासाठी उड्डाणपूल उभारावा

मंत्री पंकजाताई मुंडे यांची नितीन गडकरींकडे मागणी; डॉ.योगेश क्षीरसागरांनी मानले आभार

बीड । प्रतिनिधी

बीड-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील मंझरी हवेली फाटा (ता.बीड) येथे सातत्याने होणारे भीषण अपघात रोखण्यासाठी तातडीने उड्डाणपूल उभारण्यात यावा, अशी आग्रही मागणी भाजप नेत्या तथा राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे नवी दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेऊन केली. भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी हा प्रश्न सातत्याने लावून धरला होता. पंकजाताई मुंडे यांनी या





मागणीचे गांभीर्य मांडल्यानंतर केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, या प्रस्तावावर लवकरच कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

मांजरसुंब्याकडून येणारा तीव्र उतार, अनेक गावांचे जोड रस्ते, ढाबे आणि हॉटेल्स यामुळे मंझरी हवेली फाटा हा भाग अपघाती क्षेत्र (ब्लॅक स्पॉट) बनला आहे. याठिकाणी वारंवार निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. मंझरी, कडकणी, मांडवजाळी, करचुंडी, सुर्डीचिंचोली, पाली, कौलवाडी, भालवणी, पिंपळवाडी आदी गावांतील ग्रामस्थांनी याठिकाणी उड्डाणपुलासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले होते. त्यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपोषणस्थळी भेट देऊन या आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दिला होता व हा प्रश्न शासन दरबारी मार्गी लावण्याचे आश्वासन ◀◀ पान ३ वर

सर्वेक्षण करण्याचे निर्देश

उड्डाणपुलाच्या प्रश्नाची तत्काळ दखल घेत केंद्रीय स्तरावर मंजुरीच्या दृष्टीने पावले टाकत सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याबद्दल भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत. या उड्डाणपुलाच्या मंजुरीच्या दिशेने सुरू असलेल्या हालचालींमुळे स्थानिक नागरिक व वाहनधारकांमधून समाधान व्यक्त होत आहे.



आज बीड येथील बसस्थानकाची महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री मा. श्री. प्रतापजी सरनाईक साहेब यांनी पाहणी केली. यावेळी बसस्थानकातील विविध सुविधा, प्रवाशांच्या समस्या तसेच आवश्यक विकासकामांचा आढावा घेण्यात आला.याप्रसंगी युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे उपस्थित होते.

गेवराई शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढला; बीएससी पावडर व फॉगिंग करण्याची सय्यद एजाज यांची मागणी

प्रभाग क्रमांक १० व ११ मधील नागरिकांना डासांच्या त्रासातून दिलासा देण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाला निवेदन

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील विविध भागांमध्ये सध्या डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येची तातडीने दखल घेऊन प्रभाग क्रमांक १० व ११ मधील नाल्यांमध्ये बीएससी पावडर टाकावी, तसेच संपूर्ण परिसरात औषध फवारणी आणि धूर फवारणी (फॉगिंग) करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.



गेवराई शहरातील कोरबू गल्ली, मेन रोड, मोंढा, गोविंदवाडी रोड आणि तय्यब नगर या परिसरात डासांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य रहिवाशांना या ◀◀ पान ३ वर

पिंपळवंडीतील १७८३ पशुधनासाठी चारा छावणी सुरू करा!

तहसीलदारांकडे निवेदन; चारा व पाणीटंचाईमुळे पशुपालक संकटात

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी गावात निर्माण झालेली चारा व पाणीटंचाई लक्षात घेता,गावातील १ हजार ७८३ पशुधनासाठी तातडीने चारा छावणी सुरू करावी, अशी मागणी तहसीलदार,पाटोदा यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.पिंपळवंडी गावातील पशुधनाची आकडेवारी

दुधाळ गायी - १,०५६,म्हशी-५८०,लहान वासरे-१४७ असे मिळून १,७८३ पशुधन आहेत.



गावात चाऱ्याची कमतरता, पाणीटंचाई आणि पशुखाद्याच्या वाढत्या किमतींमुळे पशुपालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत.जनावरांचे संगोपन करणे दिवसेंदिवस कठीण होत असून, दुधाळ जनावरांच्या दूध उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे प्रशासनाने तातडीने गावातील पशुधनाची प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा ◀◀ पान ३ वर

आदित्य इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये इको-फ्रेंडली आकाश कंदील स्पर्धा, बुद्धिमत्ता आणि सर्जनशीलतेला मिळाली उत्तम संधी



बीड । प्रतिनिधी

शहरातील नामांकित आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सोमवार २ नोव्हेंबर रोजी आकर्षक 'इको-फ्रेंडली आकाश कंदील स्पर्धा' मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांमधून आलेल्या तब्बल ८१ ग्रुप्सचा उत्साहात सहभाग नोंदवत आपल्यातील नावीन्यपूर्ण कौशल्यांचे सुंदर दर्शन घडवले. पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करत विद्यार्थ्यांनी साकारलेले आकाश कंदील उपस्थितांचे विशेष आकर्षण केंद्रबिंदू ठरले.

ही कार्यशाळा आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सी.ए. कल्याणी सारडा, डॉ. राहुल खडके, डॉ. कुमार सुरवसे, डॉ. अकबर सिद्दीकी, बावणे मॅडम, वाघ सर आणि डॉ. कृष्णा पंत उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सी.ए. कल्याणी सारडा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि कंदील प्रदर्शनाच्या उद्घाटनाने झाली. ◀◀ पान ३ वर

दुष्काळी उपाययोजनांना बगल देत सत्ताधाऱ्यांचा सभा रेटण्याचा प्रयत्न

विरोधकाकडून अनेक मुद्द्यांना आक्षेप, बीड न.प.ची सभा वादळी ठरली

बीड । प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी ज्या भागात पाणी नाही त्या भागात टँकर, पाईपलाईन ची दुरुस्ती, बोरवेलची निर्मिती,हातपंपाची निर्मिती या मुद्द्यांना बगल देत स्वतःचे हितसंबंध जोपासणारे मुद्दे पुढे करत बीड नगर परिषदेची सभा चालू होती. यावर एक-दोन मुद्द्यावर चर्चा न करता पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याने विरोधी पक्षनेत्या सारिका ताई क्षीरसागर व खुर्शीद आलम यांनी आक्षेप घेतल्याने दोन्ही गटात बाचाबाची झाली आणि त्यानंतर विरोधकांनी सभा त्याग केला. गेल्या काही दिवसापासून बीडची नगरपालिका वादग्रस्त ठरत असल्याचे चिन्ह दिसत आहे.

पाणी प्रश्नावर चर्चा महत्त्वाची होती -खुशीत आलम

आगामी दुष्काळी परिस्थिती पाहता बीड शहरातील पाणी प्रश्नावर गांभीर्याने चर्चा होणे गरजेचे होते. ज्या भागातील पाईपलाईन फुटलेली आहे. त्या दुरुस्त करणे, कुपनलिका खोदणे, ज्या भागात पाणी नाही त्या ठिकाणी हात पंपाची निर्मिती करणे हे प्रश्न महत्त्वाचे होते. मात्र या प्रश्नांना बगल देत स्वतःच्या स्वार्थाचे प्रश्न पुढे करून त्यावर चर्चा सुरू झाली. प्रत्येक मुद्द्यावर चर्चा होणे गरजेचे असतानाही दोन मुद्दे जाणीवपूर्वक वगळण्यात आले. त्यामुळे आम्ही या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी केली. मात्र त्याला सत्ताधाऱ्यांनी नकार देत पुढचे मुद्दे रेटण्याचा प्रयत्न केला. आम्ही गटनेते आहोत त्यामुळे सभागृहात नागरिकांच्या हिताचे मुद्दे पुढे आले पाहिजेत आणि नागरिकांचे जोपासले पाहिजे. स्वतःचे हित आम्ही जोपासू देणार नाही अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गटनेते खुर्शीद भाई आलम यांनी दै. राज्य लोकतंत्र शी बोलताना दिली.

नगराध्यक्षा प्रेमलता पारवे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (ता. ३) लोकनेते गोपीनाथराव मुंडे सभागृहात ही विशेष सर्वसाधारण सभा झाली. यावेळी उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांच्यासह पदाधिकारी, नगरसेवक, गटनेते आणि विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

सभेदरम्यान विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ३ आणि ४ तसेच स्थायी समितीशी संबंधित प्रस्तावांच्या प्रक्रियेवर विरोधी सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. प्रभाग क्रमांक १८, २२, २३ आणि २४ मधील विकासकामांवर सभागृहात चर्चा होणे आवश्यक असताना सदस्यांना पुरेशी संधी दिली जात नसल्याचा आरोप करण्यात आला. विषयांवर चर्चा होण्यापूर्वीच मंजुरीची प्रक्रिया पुढे नेली जात असल्याने विरोधकांनी नाराजी व्यक्त केली.

घनकचरा व्यवस्थापन, पंधरावा वित्त आयोग, डम्पिंग ग्राउंड, कत्तलखाना आणि शहराचा पाणीपुरवठा या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्याची मागणी विरोधी सदस्यांनी केली. ◀◀ पान ३ वर

आष्टीत घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर; ग्राहकांच्या खिशावर अतिरिक्त शुल्काचा भार!

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणाबाबत तसेच व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅसचा वापर होत असल्याच्या प्रकारांबाबत नागरिकांमधून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. एका बाजूला घरगुती गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी ग्राहकांना प्रतीक्षा करावी लागत असल्याची तक्रार असताना, दुसऱ्या बाजूला शहरातील काही हॉटेल, ढाबे आणि खाद्यपदार्थ विक्रीच्या ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडर वापरले जात असल्याचे चित्र समोर येत असल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे गॅस वितरण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, घरगुती गॅस सिलिंडरच्या निर्धारित किमतीव्यतिरिक्त घरपोहोच शुल्काच्या नावाखाली अतिरिक्त पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारीही ग्राहकांकडून केल्या जात असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे ग्राहकांची आर्थिक पिळवणूक होत असेल, तर संबंधित गॅस वितरक आणि जबाबदार घटकांची चौकशी होणे आवश्यक आहे.

गॅस टाकीच्या किमतीव्यतिरिक्त घरपोहोच शुल्काच्या नावाखाली अधिक पैसे घेतल्याचा आरोप; हॉटेलमध्ये घरगुती सिलिंडरचा सर्रास वापर होत असल्याची चर्चा

पुरवठा विभागाच्या दुर्लक्षामुळे नियमांना हरताळ? सणासुदीच्या काळात सर्वसामान्यांची परवड; संबंधित यंत्रणेने तातडीने तपासणी करून कारवाई करण्याची मागणी



घरपोहोच शुल्काच्या नावाखाली अतिरिक्त वसुली?

घरगुती गॅस सिलिंडर हा सर्वसामान्य कुटुंबांच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक घटक आहे. मात्र, सिलिंडरच्या निर्धारित किमतीव्यतिरिक्त कोणत्या कारणासाठी किती रक्कम आकारली जाते, याबाबत ग्राहकांना स्पष्ट माहिती मिळणे गरजेचे आहे. घरपोहोच वितरणाच्या नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्यास, त्याची अधिकृत नियमांनुसार पडताळणी होणे आवश्यक आहे.

ग्राहकांनी सिलिंडर घेताना पावती तपासावी, आकारलेल्या रकमेची खात्री करावी आणि अनधिकृत वसुली झाल्याचा संशय असल्यास संबंधित गॅस एजन्सी तसेच पुरवठा विभागाकडे लेखी तक्रार नोंदवावी. ग्राहकांची आर्थिक लूट होत असल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे.

हॉटेलमध्ये घरगुती सिलिंडरचा वापर कशाच्या आधारावर?

शहरातील हॉटेल, ढाबे आणि खाद्यपदार्थ विक्रीच्या काही ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडर वापरले जात असल्याचा आरोप चर्चेत आहे. व्यावसायिक स्वयंपाकासाठी योग्य व्यावसायिक गॅस सिलिंडरचा वापर होत आहे की नाही, याची तपासणी करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर आहे.

घरगुती गॅस सिलिंडरचा अनधिकृत व्यावसायिक वापर आढळल्यास, लागू नियमांनुसार कारवाई होणे आवश्यक आहे. मात्र, कोणत्याही आस्थापनेविरुद्ध ठोस पुरावे आणि अधिकृत पडताळणीशिवाय निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे पुरवठा विभागाने प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन तपासणी करावी आणि वस्तुस्थिती नागरिकांसमोर मांडावी, अशी मागणी होत आहे.

पुरवठा विभागाच्या कार्यक्षमतेची कसोटी!

गॅस वितरण व्यवस्थेत पारदर्शकता राखणे, ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेणे आणि घरगुती गॅसचा गैरवापर रोखणे ही संबंधित यंत्रणेची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही त्यांची दखल घेतली जात नसेल, तर प्रशासनाच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

आष्टी शहरातील गॅस एजन्सींच्या वितरण नोंदी, ग्राहकांकडून आकारण्यात येणारे शुल्क, घरपोहोच वितरणाच्या पावत्या आणि व्यावसायिक आस्थापनांमधील गॅस वापर यांची नियमानुसार तपासणी करण्यात यावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

नागरिकांच्या प्रमुख मागण्या

घरगुती गॅस सिलिंडरच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26